XXIII-1

एप्रिल 2012
वर्ष 23 - अंक 1

आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

गुणवत्तापूर्ण शिक्षण विशेषांक

मुक्त मनाचा माणूस

(एखाद्या) माणसाच्या मनातील स्वातंत्र्याची ज्योत विझलेली नाही, याचा पुरावा काय? मुक्त मनाचा माणूस असे आपल्याला कोणाविषयी म्हणता येईल? आपल्या जागृत सदसद्विवेकबुद्धीद्वारे ज्याला आपले हक्क, जबाबदाऱ्या व कर्तव्य यांचे भान असते, त्याला मी मुक्त म्हणतो. जो परिस्थितीचा गुलाम न बनता, तिला बदलवून आपल्याला अनुकूल करून घेण्यासाठी तत्पर व कार्यरत असतो, त्याला मी मुक्त मानतो. जो निरर्थक रूढी, परंपरा व उत्सवांचा, अंधश्रद्धांचा गुलाम नाही, ज्याच्या मनात विवेकाची ज्योत तेवते आहे. त्याला मी मुक्त मानतो. ज्याने आपले इच्छास्वातंत्र्य गहाण ठेवले नाही; आपली बुद्धिमत्ता व स्वतंत्र विचारबुद्धी यांचा त्याग केला नाही, इतरांच्या शिकवणुकीनुसार जो आंधळेपणाने वागत नाही, वैधता व उपयुक्तता तपासल्याशिवाय व विश्लेषणाशिवाय जो कोणतीही गोष्ट आंधळेपणाने स्वीकारत नाही, आपल्या हक्कांच्या रक्षणासाठी जो सदैव सज्ज असतो, लोकनिंदा व अन्याय्य टीका यांची जो पत्रास बाळगत नाही, आपण इतरांच्या हातातील बाहुले बनू नये यासाठी आवश्यक विवेक व स्वाभिमान ज्याच्यापाशी आहे, त्यालाच मी मुक्त मानव मानतो. इतरांच्या निर्देशानुसार न वागता जो स्वतःच्या बुद्धीनुसार आयुष्याचे ध्येय व त्यानुसार जगण्याचा मार्ग ठरवितो, थोडक्यात म्हणजे जो स्वतःच्या स्वातंत्र्याचा स्वामी आहे, त्यालाच मी मुक्त मानव समजतो.

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ह्या अंकात

1. मुक्त मनाचा माणूस	डॉ.बाबासाहेब आंबेडकर	1
2. संपादकीय	--	3
3. प्रस्तावना	गीता महाशब्दे	5
4. गुणवत्तापूर्ण शिक्षण : शिक्षण हक्क अधिनियम व भारतीय समाजापुढील आह्वाने	सुषमा शर्मा	8
5. वर्गांतर्गत प्रक्रियेची गुणवत्ता	नीलेश निमकर	15
6. गुणवत्तापूर्ण शिक्षण : कार्यकर्त्यांपुढील आह्वाने	गिरीश सामंत	20
7. सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण साध्य करायचे तर सर्वंकष मूल्यमापन अत्यावश्यक!	विवेक मॉंटेरो	24
8. संकलित, नैदानिक मूल्यमापन मुलांबद्दल काय सांगू शकते?	मधुरा मणेर	33
9. माझे प्रगतिपुस्तक..... शोध शांतीचा	वैशाली गेडाम	35
10. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मार्गदर्शक आराखडा	प्रियदर्शिनी कर्वे	38
11. समारोप	मंजिरी निमकर	44
12. **पत्रसंवाद** : दाभोलकरांच्या पत्रांच्या निमित्ताने	दिवाकर मोहनी	46
मी : आर्थिक	नंदा खरे	47
13. लेखकपरिचय	--	48

संस्थापक-संपादक : दि. य. देशपांडे

गुणवत्तापूर्ण शिक्षण विशेषांक

अतिथि-संपादक : मंजिरी निमकर आणि सुबोध केंभावी

कार्यकारी संपादक : संजीवनी कुळकर्णी आणि अनुराधा मोहनी,
संपादक-मंडळ : नंदा खरे, सुनीती देव, अश्विनी कुळकर्णी, सुलक्षणा महाजन
सल्लागार-मंडळ : प्रमोद सहसबुद्धे, उत्तरा सहसबुद्धे, प्रभाकर नानावटी,
टी.बी. खिलारे, रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ, अरुंधती मुंडले, मिलिंद मुरुगकर

किरकोळ अंक रु. 30.00 (टपालखर्च वेगळा)
वार्षिक वर्गणी : व्यक्तीला रु. 300.00, संस्थेला रु. 350.00
परदेशीय वर्गणीदारांकरिता वार्षिक वर्गणी : व्यक्तीला 25 डॉलर, संस्थेला 30 डॉलर (अधिक वटणावळ)
वर्गणी कृपया डिमांड ड्राफ्टने, मनीऑर्डरने किंवा चेकनेच पाठवावी.
कोअर बँकिंगने पाठविल्यास भरत मोहनी यांना मोबा.9822736808 वर नांव पत्त्यासह माहिती द्यावी.
परगावाहून चेक पाठविल्यास वटणावळीकरिता रु. 50.00 जास्त पाठवावेत. व्ही.पी.ची पद्धत नाही.
मनीऑर्डर, चेक, ड्राफ्ट इ. आजचा सुधारकच्या नावे नागपूर पत्त्यावर पाठवावे.
वर्गणी भरण्याची ठिकाणे :
पोस्टाने आणि नागपूरमध्ये : **गौरीवंदन, 123, शिवाजीनगर, नागपूर 440010.**
पुण्यामध्ये रोखीने : मिळून साऱ्याजणी, 40 ब, भोंडे कॉलनी, देवनाळकरांचा बंगला,
अलुरकर म्यूझिक हाऊससमोर, कर्वे रोड, पुणे - 411 004

संपादकीय

सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण ह्या सूत्राभोवती ह्या विशेषांकातील लेख गुंफलेले आहेत. हा विशेषांक एरवीच्या अंकांपेक्षा काहीसा वेगळा आहे.

बालकांना निःशुल्क आणि अनिवार्य शिक्षणाचा हक्क देणारा अधिनियम एप्रिल 2010 पासून लागू झाला. ह्या अधिनियमाच्या कलम 8 व कलम 29 नुसार भारतातील प्रत्येक मुलाला आता चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाचा हक्क मिळाला आहे. मात्र, हा अधिनियम लागू होऊन 18 महिने झाले असले तरी त्यात उल्लेख असलेल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या उद्दिष्टाबाबत राज्यात पुरेसे विचारमंथन होताना दिसत नाही. अशाप्रकारचे मंथन व्हावे ह्या हेतूने 14 व 15 जानेवारी 2012 रोजी 'सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण' हे दोन दिवसांचे निवासी संमेलन सेवाग्राम, वर्धा येथे आयोजित केले गेले होते. ह्या संमेलनात ह्या अधिनियमाशी संबंधित अशा सर्व समाजघटकांमध्ये काम करणारे शिक्षक, अधिकारी, कार्यकर्ते व तज्ज्ञ एकत्र आले होते. ह्या दोन दिवसांत जी मांडणी झाली व जे विचारमंथन घडून आले त्यावर आधारित लेखांचा संग्रह आता ह्या विशेषांकाच्या रूपात आपल्यासमोर आलेला आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणावर जे वैविध्यपूर्ण व विपुल लेखन देशी-परदेशी भाषांमध्ये झाले आहे ते पाहता आता अधिक तात्त्विक चर्चेची गरज (किंवा उपयोग!) काय आहे असे वाटू शकेल. मात्र नेमक्या एका दिशेने, नियोजित असे काम सामूहिकपणे करायचे असेल तर इतकी विविधता हीच एक अडचण भासू शकते व ह्या अडचणीवरील एका वेगळ्या, नेमक्या चर्चेची गरज जाणवते.

सृजनशील बनवणारे शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोण विकसित करणारे शिक्षण, समतेसारख्या मूल्यावर आधारित समाज घडवायला उपयुक्त ठरणारे शिक्षण, मातृभाषेचे व मायबोलीचे जतन करायला आवश्यक असणारे शिक्षण, चांगल्या पगाराची नोकरी मिळवून देणारे शिक्षण असे जे अनेक प्रकार समाजात व शैक्षणिक चर्चेत आढळतात ते एकाच व्यापक अशा दृष्टिकोणामध्ये सुसंगतपणे गुंफता येतील का हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचबरोबर हेही खरे आहे की अशाप्रकारे अनेक स्रोतांमधून मिळालेल्या दृष्टिकोणांचा, तत्त्वांचा, अनुभवांचा सुसंगत असा मेळ घालणे ही एक बऱ्यापैकी गुंतागुंतीची तात्त्विक भानगड आहे. शिवाय, असा मेळ घालताना सर्वच दृष्टिकोण व त्यांचे सर्वच पैलू आपापल्या जागी वेगवेगळ्या प्रकारे योग्यच आहेत असा गुळमुळीतपणा टाकून द्यावा लागतो. ज्या पैलूंचा मेळ घालता येत नाही ते वेगळेच राहू देणे किंवा ज्या पैलूंचा मेळ घालणे योग्य नाही असे वाटते ते स्पष्टपणे नोंदवणे ही खबरदारी घेतली नाही तर अपेक्षित असलेली स्पष्टता अशा प्रकारच्या मांडणीत येत नाही.

ह्या अधिनियमामुळे अश्या चर्चेला व कामाला एक नवीन चौकट मिळाली. एक नेमका अधिनियम व एक नेमका अभ्यासक्रमाचा आराखडा लोकांसमोर आला. प्रसारमाध्यमांमधून चर्चा होऊ लागल्या, लेख छापून येऊ लागले. प्रत्येक मुलाला चांगल्या गुणवत्तेचे शिक्षण मिळाले नाही तर आता कायदेशीर कारवाई करता येईल ही बाब व त्याची

व्यवहार्यता चर्चिली गेली. प्रत्येक मूल शिकले पाहिजे ह्यासाठी आता सरकार कायद्याने बांधील आहे हे परत परत अधोरेखित केले गेले. अभ्यासक्रम आराखडा ही काय चीज असते व त्याला इतके महत्त्व का द्यायचे हे लक्षात येऊ लागले. ह्या दृष्टीने पाहता शिक्षण हक्क अधिनियम ही एक लक्षणीय घटना व एक संधी आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

'सोमवारपासून मी काय करू?' अशा अर्थाचे शीर्षक असलेले जॉन होल्ट या प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञाचे एक इंग्रजी पुस्तक आहे. लांबलचक, उलटसुलट तात्त्विक चर्चा झाल्यावर आता नक्की काय करू हे शिक्षकांना, पालकांना समजत नाही ह्या बाबीकडे त्या नावाचा रोख आहे. शिक्षण हक्क अधिनियमाच्या वेगवेगळ्या पैलूंवर जी चर्चा होत आहे ती एकत्रितपणे समजून घ्यायचा प्रयत्न केला तर वरील शीर्षकाची आठवण होते. ह्या सर्व चर्चेत एक प्रकारचा विखुरलेपणा जाणवतो. महत्त्वाचे मुद्दे कोणते, दुय्यम मुद्दे कोणते व पुढील महिन्यात, पुढील एका वर्षात नेमके काय करायचे हे अशा विखुरलेपणामुळे लक्षात येत नाही. ह्यामुळे अनेक शिक्षक व शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्ते गोंधळून जाऊ शकतात.

अशा संस्थांना, कार्यकर्त्यांना समजेल असा नेमका मार्गदर्शक-आराखडा तयार करण्याचे आणि तो सर्वांसमोर ठेवण्याचे काम या सम्मेलनाने केले. हे काम प्रत्यक्षात उतरायचे असेल तर त्याची विविध व्यासपीठांवर मांडणी आणि छाननीही व्हायला हवी.

प्रत्येक मूल शिकले पाहिजे व प्रत्येक मुलाला चांगल्या गुणवत्तेचे शिक्षण मिळाले पाहिजे हा आग्रह केवळ शिक्षणक्षेत्रातल्यांच्याच नाही तर आपल्या सर्वांच्याच मनात अग्रक्रमाने आहे, आणि ठरवले तर तसे घडणे शक्यही आहे असा विवेकपूर्ण विश्वास रुजावा, यासाठी ह्या अंकाची रचना झालेली आहे.

'प्रस्तावना',
'गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे काय?',
'गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे मूल्यमापन कसे असावे?',
'हे साधण्यासाठी काय करावे लागेल?'

ह्या विषयांवर या सम्मेलनातील सत्रांमध्ये मांडणी झाली. ती शक्य तेवढी स्पष्टपणे आपल्यासमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. कायद्याचा आधार मिळालेला असला तरी आज हे सारे दूर आणि अप्राप्य वाटते ह्याची जाणीव आहे तरी, काही घडायचे असेल तर आधी त्याचे स्वप्न तर पाहावे लागते.

– संपादक

[**टीप :** बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणाऱ्या कायद्याबद्दल हा अंक काढण्यात आला आहे. Act या शब्दाचा मराठी पर्याय अधिनियम असा आहे. कायदा हा शब्द अधिक रूढ व प्रचलित असला तरी तो Law या शब्दाचा पर्याय आहे, Act चा नाही. येथे शास्त्रीय पातळीवरून चर्चा केलेली असल्यामुळे अधिनियम हा पारिभाषिक शब्द जाणीवपूर्वक योजला आहे. वाचकांनी दोहोंमधील भेद कृपया लक्षात घ्यावा. – *कार्य. संपा.*]

प्रस्तावना

गीता महाशब्दे

'प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे' या विधानाबद्दल भारतात एकमत आहे, अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून! 'गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे नेमके काय?' या प्रश्नावर चर्चा करताना मात्र मतभेद सुरू होतात. 'किमान साक्षर झाले तर पुरे', 'अमेरिकेतील सर्वोच्च विद्यापीठात प्रवेश मिळविला पाहिजे', 'भारतीय समाजातील विषमतेवर मात करता येईल असे दमदार शिक्षण प्रत्येक बालकाला मिळाले पाहिजे' अशा निरनिराळ्या कसोट्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाला लावल्या जातात. शासकीय धोरणेही या विविध टोकांच्या अधेमधे कोठेतरी फिरत राहतात, हा आपला गेल्या 65 वर्षांचा अनुभव आहे.

दुसऱ्या बाजूने पाहावे तर महाराष्ट्रात शिक्षणाच्या बाबतीत खूप मूलभूत विचार झालेला आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, धोंडो केशव कर्वे, महात्मा गांधी, विनोबा भावे, बाबासाहेब आंबेडकर, अनुताई वाघ, ताराबाई मोडक, जे.पी.नाईक यांसारख्या दिग्गजांनी शिक्षणाबाबत सखोल विचार व काम केलेले आहे. भारतीय संविधानात 14 वर्षांपर्यंतच्या सर्व बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची हमी दिलेली आहे. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये 0 ते 14 वयोगटातील बालकांच्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला व वैज्ञानिक दृष्टिकोणाला महत्त्वाचे स्थान आहे. 2002 साली झालेल्या संविधान-दुरुस्तीने शिक्षणाचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून स्वीकारलेला आहे.

तरीदेखील गेल्या काही वर्षांमधील राज्यपातळीवरील शैक्षणिक धोरणांना कोणतीच निश्चित दिशा नाही असे दिसते. या परिस्थितीत एक वैशिष्ट्यपूर्ण घटना 2005 साली भारताच्या शिक्षणक्षेत्रात घडली आणि ती म्हणजे 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005' ची निर्मिती. आपल्या समानतेचा आणि शिक्षणाचा संबंध या आराखड्याने ठामपणे पुढे आणला आणि समानतेचा व गुणवत्तेचा अतूट संबंध अधोरेखित केला. केवळ संधीच्या समानतेचा नाही, तर निष्पत्तीच्या समानतेचाही. यात म्हटले आहे, **'केवळ संधीची समानता म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षण नाही. समान संधी किंवा मुलींना मुलांइतकीच संधी अशी केवळ सारखेपणाने वागण्याची औपचारिक पद्धत प्रत्येकाच्या शिकण्यासाठी पुरेशी पडत नाही. विविधता, फरक आणि त्यामुळे येणारी वंचितता लक्षात घेऊन, निष्पत्तीच्या समानतेपर्यंत जाण्यासाठी, एक व्यापक आणि दमदार दृष्टिकोण स्वीकारण्याची आज गरज आहे. असमान आणि अन्याय्य परिस्थिती वाट्याला आलेल्यांना त्यातून वर येऊन स्वतंत्र आणि समान नागरिक म्हणून कार्यरत होण्यासाठीची ताकद शिक्षणानेच द्यायला हवी'**. अशा सक्षम करणाऱ्या शिक्षणाला राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 ने गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हटले आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 नंतर सर्व राज्यांनी आपापला अभ्यासक्रम

आणि पाठ्यपुस्तके त्याच्याशी सुसंगत करावी असे अनेकदा केंद्र पातळीवरून सुचवले गेले. काही राज्यांनी ते केलेसुद्धा. महाराष्ट्रासारखे पुरोगामी राज्य मात्र या बाबतीत वारंवार पुढील तारखा मागत राहिले.

1 एप्रिल 2010 रोजी सर्व देशभरात शिक्षण हक्क अधिनियम लागू झाला. 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क घटनेने बहाल केला. तसेच राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 ला शिक्षण हक्क अधिनियमासाठीचा अभ्यासक्रम आराखडा म्हणून शासनमान्यताही मिळाली. हा शिक्षण हक्क अधिनियम अनेक बाबतीत अपुरा आहे, 0-6 हा वयोगट यातून वगळलेला आहे. खासगीकरणाचा रस्ता त्याने खुला सोडलेला आहे, असे असले तरीही 6 ते 14 वयोगटातील मुलांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संदर्भातील काही महत्त्वाच्या बाबी या अधिनियमाने अनिवार्य केलेल्या आहेत. आता मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे हे कोणाच्या मेहेरबानीवर अवलंबून नाही. मुलांचा तो हक्क आहे आणि शासनाचे कर्तव्य. शिक्षण हक्क अधिनियमात असलेली हक्क ही संकल्पना आधीपेक्षा संपूर्ण वेगळी आहे. यानुसार न्याय्य गुणवत्तेचे शिक्षण सर्व बालकांना मिळायलाच हवे अशी शासनाची 'सक्ती' आहे. यापूर्वी मुले शिकत नाहीत याची जबाबदारी 'त्या मुलांना शिक्षणात रस नसतो, किंवा ती मुले मतिमंद आहेत' अशी लेबले चिकटवून मुलांवर ढकलली जायची, किंवा पालकांना 'अडाणी, अशिक्षित' मानून ती जबाबदारी पालकांवर ढकलली जायची. पण आता तसे चालणार नाही.

सर्व शिक्षा अभियानाने गुणवत्तेच्या संदर्भातील देशभरातील परिस्थितीचा अभ्यास केला. मात्र गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या मार्गातला सर्वांत महत्त्वाचा प्रश्न सांगताना त्यांनी म्हटले आहे, 'अभ्यासक्रमनिर्मितीबाबत शिक्षणयंत्रणेचा दृष्टिकोण अगदी विस्कळीत आहे. असे जाणवते. पाठ्यक्रमनिर्मिती, पाठ्यपुस्तकनिर्मिती, शिक्षकांचे प्रशिक्षण, संपादणुकीचे मूल्यमापन, वर्गातील प्रक्रिया, शाळा-व्यवस्थापन या अभ्यासक्रमाच्या गाभा घटकांना एकमेकांशी संबंधित आणि एकसंध घटक म्हणून न पाहता, ते जणू काही वेगवेगळे, स्वतंत्र घटक मानून शिक्षण-यंत्रणेतले कार्यक्रम आखलेले असतात.' यावर तोडगा काढायचा तर या सर्व घटकांच्या, आणि ही कामे करणाऱ्या संस्था-व्यक्तींच्या एकसूत्रीकरणाने काम करणे आवश्यक आहे.

बालकांना त्यांचा हक्क मिळवून देणे ही भारतीय नागरिक असलेल्या प्रत्येकाचीच आता संवैधानिक जबाबदारी आहे. त्यामुळे 'ही शासनाची जबाबदारी'असे म्हणून आता कोणी हात झटकू शकणार नाही. 'आम्ही शक्य ते सर्व प्रयत्न केले आणि जितकी मुले शिकली तितक्यांना शिकविले' असे आता शासन म्हणू शकणार नाही. 'मागील पानावरून पुढे चालू'. 'आम्ही हे करीतच आहोत' असा दृष्टिकोण बाळगून आता चालणार नाही. आपण आजपर्यंत जे काही केले आहे त्याने 100% मुले शिकलेली नाहीत हे आपले वास्तव आहेच. प्रत्येक मूल शिकावे यासाठी प्रत्येक शिक्षकाने, प्रत्येक अधिकाऱ्याने संपूर्ण उत्तरदायित्व मानून काम करावे लागेल. त्यासाठी प्रक्रियापद्धती, वातावरण, कार्यसंस्कृती सगळ्यांत आमूलाग्र बदल

करावे लागतील. प्रत्येकापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचवण्याची सक्ती शासनावर आहे, त्यामुळे उत्तदायित्व मानून पद्धतशीर काम करावेच लागेल. याचा अर्थ असा की शासनाला हे काम करणे शक्य होईल असे वातावरण निर्माण करणे, सक्रिय मदत करणे आणि गरज पडल्यास शासनावर दबाव आणणे ही सर्व कामे आता समाजाने केली पाहिजेत.

सर्व शिक्षा अभियानाच्या दस्तावेजात असेही म्हटले आहे की, 'गुणवत्ता सुधारण्याचा कोणताही कार्यक्रम यशस्वी व्हायचा असेल तर त्याने समानता आणि सामाजिक न्यायासाठी होणाऱ्या कामाशी जोडून घ्यायला हवे. सर्व प्रकारच्या पार्श्वभूमींतून येणाऱ्या मुलांच्या–विशेषतः वंचित गटातील–ज्ञानाला आणि अनुभवाला शालेय शिक्षणात अग्रभागी ठेवले आणि त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक संदर्भांना मुख्य स्थान दिले तरच हे साधणे शक्य आहे'.

शिक्षण हक्क अधिनियमासाठीची शिक्षणपद्धती

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 ने शिकण्या-शिकविण्याची ज्ञानरचनावादी पद्धत वापरण्याचे सुचविले आहे. 'या पद्धतीत शिकणारी व्यक्ती सभोवतालच्या जगाचा स्वतःचा स्वतः अर्थ लावते. असमानता आणि न्याय यासारखे प्रश्न अग्रभागी ठेवून विश्लेषणात्मक पद्धतीने हे करायचे असते. त्यामुळे शिकणारी व्यक्ती संकल्पना तर शिकेलच, पण त्याहीपुढे जाऊन ती सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी सक्षमही होईल.'

गुणवत्तेच्या या पायरीपर्यंत जायचे, तर 'प्रत्येक मूल शिकू शकते, प्रत्येक शिक्षक शिकवू शकतो, प्रत्येक अधिकारी कसून काम करू शकतो, शासकीय शाळांचा दर्जा पद्धतशीर प्रयत्नाने सुधारता येऊ शकतो, उच्च दर्जाचे शिक्षण, उच्च दर्जाचे काम हा प्रत्येकाचा हक्क आहे आणि प्रत्येकाला त्याची आस आहे..... ' हा विश्वास यंत्रणेच्या मनात असणे आवश्यक आहे. आज हा विश्वास डळमळीत झालेला दिसतो. त्यामुळे काही शाळांमध्ये काम करून, यश दाखवून हा विश्वास पुन्हा दृढ करावा लागेल. वैज्ञानिक प्रयोगशील दृष्टिकोण ठेवून सातत्याने प्रगती करीत जाणे हा यशाकडे जाण्याचा मार्ग आहे.

यासाठी महाराष्ट्रातले सुमारे 100 शिक्षक, अधिकारी, शिक्षणकर्मी ह्यांनी एकत्र येण्याचे ठरविले. सर्व संबंधित घटकांच्या दुतर्फी देवाणघेवाणीतून शिक्षण हक्क अधिनियमाला अभिप्रेत असलेल्या गुणवत्तेच्या पहिल्या पायरीची मानके ठरवावीत, तेथपर्यंत पोहोचवण्यासाठीचा मार्गदर्शक आराखडा सर्वांच्या सहभागाने ठरवावा आणि तो शासनासमोर सादर करावा असे ठरले. शासनाने हा आराखडा स्वीकारून कामाला सुरुवात केली तर जास्त वेगाने काम होईल. परंतु शासनाने सक्रिय पुढाकार घेतला नाही, तरीही 'आपल्या योजनेनुसार' काम करून आपण आपापल्या भागात, आपापल्या शाळांमध्ये यशाची उदाहरणे निर्माण करू, म्हणजे शासनाचाही आत्मविश्वास वाढेल आणि गुणवत्तेचा कार्यक्रम या पद्धतीने करण्याबाबत शासनावर दबाव येईल. आपल्या शाळांमध्ये शिक्षण हक्क अधिनियमाला अपेक्षित असलेली गुणवत्ता साधण्याबरोबरच हे काम इतर शाळा-शिक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे कामही शिक्षक-शिक्षणकर्मींनी करावे असे ठरले. शिक्षकांवर आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांवर संपूर्ण विश्वास

टाकणाऱ्या व्यवस्थांद्वारे हा कार्यक्रम राबविला गेला पाहिजे. त्यामुळे अशा व्यवस्थाही या प्रक्रियेत निर्माण होतील.

अशा भूमिकेतून शिक्षक-अधिकारी-शिक्षणकर्मी स्वखर्चाने एकत्र आले, त्यांनी शासनालाही निमंत्रित केले आणि शिक्षण हक्क अधिनियमाच्या गुणवत्तेच्या व्यापक उद्दिष्टाच्या प्रभावी अंमलबजावणीचे काम सुरू करायचे या मंडळींनी ठरविले. ज्या सभागृहाचे 1942 साली पहिले पायाभूत (बेसिक) शिक्षण प्रशिक्षण केंद्र म्हणून उद्घाटन केले त्याच सभागृहात 14 व 15 जानेवारी 2012 रोजी सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण संमेलन पार पडले.

गुणवत्ता म्हणजे काय, गुणवत्तेच्या अंमलबजावणीतील आह्वाने, मूल्यमापन व रोड मॅप, अशी चार सत्रे या संमेलनात संपन्न झाली. ह्या सत्रांमध्ये मांडणी केलेल्या निबंधांचा वृत्तान्त येथे मांडलेला आहे.

3 रा माळा, सुरश्री प्लॉट नं.2, कल्पतरु पथ, नवसह्याद्री सोसायटी, कर्वेनगर पुणे - 52.

■■

गुणवत्तापूर्ण शिक्षण : शिक्षण हक्क अधिनियम व भारतीय समाजापुढील आह्वाने

सुषमा शर्मा

शिक्षण कशासाठी या प्रश्नाचे उत्तर आपण आजच्या गुंतागुंतीच्या समाजजीवनात शोधतो तेव्हा शिक्षणाच्या गुणवत्तेचाही शोध घेण्याची दिशा आपल्याला सापडते. या ठिकाणी आपण बालकांच्या शिक्षण हक्काच्या संदर्भात गुणवत्तेचा अर्थ शोधणार आहोत. मानवप्राण्याचे वैशिष्ट्य, त्याच्या सर्जनशीलतेत आणि अर्थपूर्णरीत्या जगता यावे आणि असे जगता येण्यासाठी आवश्यक असा समाज देशाच्याच नव्हे तर जगाच्या पाठीवर घडावा यासाठी आपण प्रयत्नशील असणे हे शिक्षणाचे व्यापक उद्दिष्ट आपल्याला मानता येईल. प्रत्येक माणसाला जगण्याचा, शिकण्याचा हक्क आहे ही भूमिका, आणि एक बालक म्हणून त्याची वैशिष्ट्ये ह्या दोन्ही संदर्भांना गृहीत धरून त्याच्या शिक्षणाचा विचार करावा लागणार आहे. या दोन्ही संदर्भात देशाच्या पातळीवर स्वातंत्र्य मिळण्याच्या काळापासून आजपर्यंत झालेल्या महत्त्वाच्या प्रयत्नांचा आढावा घेत आपण आज गुणवत्तेचा अर्थ शोधणार आहोत.

शिक्षणविषयक अधिनियमाचे राष्ट्रीय संदर्भ :

एप्रिल 2009 ला सर्व बालकांसाठी 'मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम' लागू झाला. पण जो शिक्षण हक्क स्वातंत्र्य मिळाल्यावर दहा वर्षांतच वास्तवात येणे अपेक्षित होते तो मान्य करण्यासाठी अर्धशतकाहून अधिक काळ लोटला. आतापर्यंत शाळा उघडून

मुलांची नोंदणी करणे यावर आपण बऱ्यापैकी काम केलेले आहे. मागील 60 वर्षांच्या प्रयत्नांकडे पाहिले असता शाळांच्या उपलब्धतेबाबत थोडीफार समाधानकारक परिस्थिती आहे असे म्हणता येईल. पण किती प्रमाणात मुले शिकती झाली आणि किती प्रमाणात ती गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करू शकली असा विचार केल्यास स्थिती समाधानकारक नाही हे आता शासनालाही मान्य आहे. त्यामुळेच सदर अधिनियम येणे अनिवार्य झाले होते. तो आला परंतु पण यात अनेक महत्त्वाच्या उणिवा राहिल्या आहेत. संविधान लागू झाल्यापासून दहा वर्षांच्या आत चौदा वर्षे वयापर्यंतच्या सर्व बालकांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण दिले जाणे हा मूलभूत हक्क बनावा हे संविधानाच्या 45 व्या कलमात स्पष्टपणे नमूद केलेले असूनही प्रत्यक्षात हा अधिनियम येण्यास 50 वर्षांहून अधिक काळ लागला. या दरम्यानच्या काळात भारताने संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे जाहीर केलेल्या बालक-हक्काच्या जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करून मुलांच्या जागतिक स्तरावर मान्य झालेल्या हक्कांच्या पूर्ततेची जबाबदारीही राष्ट्र म्हणून घेतली. या जाहीरनाम्यानुसार मुलांचे बालपण 18 वर्षेपर्यंत गृहीत धरलेले आहे. बदलत्या काळातील गरजा ध्यानात घेता स्वाभाविकपणे शिक्षण हक्काचा कालावधी 18 वर्षेपर्यंत वाढविणे सयुक्तिक असताना या अधिनियमाने केवळ 6-14 वर्षे वयोगटातीलच बालकांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. 0 ते 6 वर्षे या बालकांच्या सर्वाधिक वेगाने होणाऱ्या विकासाच्या टप्प्याची कायदेशीर जबाबदारी टाळण्यासोबतच 18 वर्षेपर्यंतची जबाबदारी घेण्याचेही नाकारले.

गुणवत्ता विकसनाचे ऐतिहासिक संदर्भ

देशातील शिक्षणास गुणवत्ता विकसनाच्या अंगाने दिशा देण्याचा पहिला व्यापक प्रयत्न 1937 साली झालेल्या *वर्धा शिक्षण परिषदेत* झाला. आज त्याच वर्ध्यास शिक्षण हक्क अधिनियम लागू झाल्यानंतर हे राज्यस्तरीय संमेलन होत आहे ही विशेष बाब होय. स्वातंत्र्य दृष्टिपथात आले असताना स्वतंत्र भारतातील समाज कसा असावा याचे स्पष्ट चित्र गांधीजींनी रेखाटले होते. स्वातंत्र्य समता आणि न्याय यावर आधारित अहिंसक समाजाची बांधणी ते नयी तालीमद्वारे करू इच्छित होते. बौद्धिक कामाइतकेच निर्माणाचे काम समाजाच्या धारणेसाठी महत्त्वाचे आहे व समाजात दोन्ही कामांना समान प्रतिष्ठा मिळायला हवी असे त्यांचे मत होते. ही समता वास्तवात येण्यासाठी औपचारिक शिक्षणात ते काम आणि ज्ञान ह्यांची एकत्रित बांधणी करून बुद्धिजीवी व श्रमजीवी यांच्यातील अंतर सांधू इच्छित होते. आज त्यांच्या म्हणण्याला सबळ मानसशास्त्रीय आधार लाभलेला आहे हे नमूद करायला हवे (राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा 2005), कामातून बुद्धीस व शक्तीस प्रेम व सहकार या मूल्यांची जोड मिळाल्यास समतामूलक, न्याय्य, स्वशासित व अहिंसक समाजाची रचना अधिक सहजतेने होऊ शकेल ही त्यांची धारणा होती. त्यांनी बुद्धी, शरीर व मन यांच्या संतुलित विकासासाठी अभ्यासक्रमाची आखणी करावी असे आवाहन या परिषदेत सहभागी झालेल्या व या विचारांची गरज पटलेल्या काँग्रेसमधील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञांना केली. गांधीजींच्या मार्गदर्शनानुसार व झाकिर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली जीवनाभिमुख शिक्षणाचा *नयी तालीम*चा

अभ्यासक्रम तयार झाला. नयी तालीम हा विचार काळाशी व परिस्थितीशी सुसंगत व्हावा यासाठी नित्यनूतनता हे महत्त्वाचे तत्त्व मानले गेले.

काँग्रेसचे प्रांतीय सरकार 1938 ते 1958 या काळात जेथे जेथे होते त्या प्रांतामध्ये नयी तालीमची 50,000 हून अधिक विद्यालये चालली; मोठ्या प्रमाणावर शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था झाली. पण राजकीय व सामाजिक अनास्थेमुळे हा प्रयत्न देशव्यापी न होता अल्पजीवी ठरला. राजकीय अनुकूलता, इच्छाशक्ती व संशोधनाची साथ लाभली असती तर आजचे शिक्षणाचे चित्र नक्कीच खूप वेगळे व चांगले झाले असते.

त्या अनुषंगाने शिक्षणव्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याच्या हेतूने देशाच्या इतिहासातील सर्वांत मोठा शिक्षण आयोग, *कोठारी कमिशन* या नावाने वर्ष1964 मध्ये नेमला गेला. कोठारी कमिशनच्या अनुसार उत्तम शिक्षणात खालील गोष्टी महत्त्वाच्या ठरतात-

1. 'लिटरसी' (भाषा, मानवशास्त्र व सामाजिक शास्त्रे ह्यांचे अध्ययन),
2. 'न्युमरसी' (गणिताचे व निसर्गविज्ञानाचे अध्ययन),
3. कार्यानुभव
4. समाजसेवा

सर्वांना समान गुणवत्तेचे शिक्षण मिळणे व समाजविकासाच्या रूपाने शाळांचे सामाजिक जीवनाशी सघनपणे जोडलेले असणे ह्यांस खूप महत्त्व दिले गेले. प्राथमिक शाळांपासून महाविद्यालयीन स्तरापर्यंत कार्यानुभव ही अत्यावश्यक बाब मानली गेली. प्राथमिक शिक्षणाच्या पाठ्यक्रमाचा अनुबंध स्थानिक भौगोलिक व सामाजिक परिस्थितीशी जोडला जाणे महत्त्वाचे मानले गेले. 'प्रारंभिक शिक्षण' (8 वर्षांचे) मातृभाषेतून दिले जावे हीदेखील त्यातील महत्त्वाची शिफारस होती. शिक्षकांचे सेवापूर्व व सेवाकालीन सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण व त्यासाठी आनुषंगिक रचनांची उभारणी आवश्यक मानली गेली. या शिफारसी अंमलात आल्या असत्या तर मागील 50 वर्षांत आपल्याला समतामूलक गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दिशेने मोठी वाटचाल करता आली असती. पण या शिफारशींवरदेखील गंभीरपणे विचार व कृती झाली नसल्याचे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व या आयोगाचे सेक्रेटरी, श्री. जे. पी. नाईक यांनी अत्यंत नाराजीने व्यक्त केले आहे. (Kothari Commission and After, 1979)

जनता सरकारच्या काळात शिक्षणक्षेत्रात मूलभूत स्वरूपाचे बदल होण्याची गरज लक्षात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, आचार्य राममूर्ति यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीनेदेखील संविधानात्मक मूल्य वास्तवात येण्यासाठी समान शिक्षण पद्धतीची अनिवार्यता असल्याचे मांडले. पण सरकारच न चालल्यामुळे चांगल्या सूचनाचीही विल्हेवाट लागते हे अनुभवाला आले. पुढे 1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाद्वारे आपल्या देशात या वैविध्याकडे समस्या म्हणून न बघता सांस्कृतिक समृद्धी म्हणून बघता यावे याद्दष्टीने प्रयत्न करण्यात आला. 1992 मध्ये शिक्षण अधिक लवचीक, प्रासंगिकता व गुणवत्तेचे भान ठेवणारे व्हावे यासाठी राष्ट्रीय कार्ययोजना तयार करण्यात आली. पण कागदोपत्री विचार चांगले मांडले गेले तरी प्रत्यक्षात शिक्षणपद्धती

अधिकाधिक माहितीप्रधान, बोजड, परीक्षाकेंद्रित, स्पर्धात्मक होत गेली; पुस्तकांचे आकार वाढू लागले. पालकांच्या मुलाबाबतच्या अपेक्षा फार वेगाने वाढू लागल्या. पुस्तकांच्या व अपेक्षांच्या ओझ्याने मुलांची पाठ वाकू लागली; बालकावर अधिकाधिक माहितीचा भडिमार केल्यासच बालक हुशार होते हा भ्रम दृढ होत गेला. या परिस्थितीचे भान 1993 ला स्थापन झालेल्या यशपाल समितीने तीव्रपणे करून दिले.

जागतिक मुक्त बाजारपेठेची व्यवस्था जसजशी बळकट होते आहे तसतसा शिक्षणक्षेत्रावरही तिचा पगडा भीषणपणे वाढत चाललेला आहे. शिक्षण केवळ बोजड व स्पर्धात्मकच राहिले नाही तर त्यास टोकाच्या विषमतेनेही घेरलेले आहे. इंग्रजी भाषा म्हणून उत्तमरीत्या जाणण्यापेक्षा तिच्याकडे माध्यमभाषा म्हणून स्वीकारण्याकडे वाढणारा कल याला कुठलाही शैक्षणिक आधार नसूनही सांस्कृतिक व आर्थिक वर्चस्वाची भाषा म्हणून तिचा स्वीकार मोठ्या प्रमाणावर होतो आहे. याचे परिणाम बहुविध संस्कृतीतील बालकांच्या कोवळ्या मनावर काय होतील; याबाबत प्रौढांचे जग अत्यंत बेदखल आहे. निर्व्याज, निर्वैर, सर्जनशील व संवेदनशील कोवळ्या मनाला व्यवहाराच्या व असंवेदनशीलतेच्या कोरड्या जगात ढकलण्यात कुठले न्याय्य(!) समाधान प्रौढ समाज मिळवतो याचा आपण विचार करायला हवा. एका बाजूला बालकाच्या मनोविश्वाचे ज्ञान होत असल्यामुळे शिक्षण अधिकाधिक बालकेन्द्री होण्याची शिक्षणशास्त्रीय गरजही ध्यानात येते आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा 2005

या परिस्थितीचा कात्र मुलांवर वाढत असतानाच संवैधानिक मूल्यांची जाण ठेवत सर्वोच्च न्यायालयाने प्रारंभिक शिक्षण हा मुलांचा मूलभूत हक्क असल्याचा निर्वाळा 2002 साली दिला. प्रो. यशपाल यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय पातळींवर शिक्षणाबाबत आस्था बाळगणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचे मत ध्यानात घेऊन एन.सी.ई.आर.टी.द्वारे राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला.

समता व गुणात्मकतासंबंधी या अभ्यासक्रम आराखड्याची भूमिका

समता व गुणवत्ता या दोन्ही गोष्टींमध्ये अजिबात द्वंद्व नसून शिक्षणात गुणवत्ता नसेल तर समता येणे केवळ अशक्य आहे. समता जर यायची असेल तर लोकशाही व्यवस्थेत सर्वांना बरोबरीने सहभागी होता आले पाहिजे. त्यामुळे आता शिक्षण उपलब्ध करून देणे पुरेसे नाही तर समान गुणवत्तेचे शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, एवढेच नव्हे तर सर्व बालकांस समान गुणवत्तेच्या शिक्षणाची प्राप्ती होत आहे याची खात्री होण्यासाठी सर्वंकष व सातत्यपूर्ण मूल्यमापनाद्वारे प्रत्येक बालक विशिष्ट स्तरावर गुणवत्तेसाठी अपेक्षित क्षमता प्राप्त करते आहे हे निश्चित करणेही अत्यावश्यक आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि मुलांचा मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम

वर उल्लेखिलेल्या आर्थिक सामाजिक पार्श्वभूमीवर 2009 एप्रिलमध्ये लागू झालेल्या शिक्षण हक्क अधिनियमात गुणवत्तापूर्ण शिक्षण हा सर्व बालकांचा हक्क असल्याचे नमूद केलेले

आहे. या अधिनियमाने गुणवत्तेच्या संबंधी 2005 चा आराखडा पायाभूत मानलेला आहे. या अधिनियमाचा गुणवत्तेच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाचा भाग म्हणजे पाचव्या प्रकरणातील कलम 29. यामध्ये अभ्यासक्रम व मूल्यमापनविषयक नमूद केलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत. त्याच्या आधारे प्रत्येक राज्यातील या कार्यासाठी निर्धारित संस्थेस अभ्यासक्रम व मूल्यमापनाच्या पद्धती ठरवाव्या लागणार आहेत :

1. अभ्यासक्रमाची आखणी संविधानात दिलेल्या मूल्यांना अनुसरून असली पाहिजे.
2. बालकांचा सर्वांगीण विकास साधला जाईल असा प्रयत्न असावा.
3. अभ्यासक्रमाद्वारे बालकांमधील शारीरिक व मानसिक/बौद्धिक क्षमतांचा सर्वोत्तम विकास व्हावा.
4. निसर्गतः माणूस ज्ञानाची रचना करण्याची क्षमता बाळगतो. त्यानुसार अभ्यासक्रमाची रचना असावी;
5. अध्ययन-अध्यापन पद्धती मुलांच्या उपजत कृतिशीलतेस, शोधकवृत्तीस चालना देणाऱ्या असाव्यात. या पद्धतीचे नियोजन करताना व अवलंब करताना बालकांना सहभागी करून घेतले जावे.
6. शिक्षणाचे माध्यम हे संभवतः बालकांची मातृभाषा असावी.
7. शालेय अभ्यासक्रम व शालेय वातावरण भयमुक्त, ताणविरहित असावे, जिथे मूल निर्भयपणे अभिव्यक्त होऊ शकेल.
8. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाद्वारे बालकांची समज, ज्ञान व उपयोजन, क्षमतांचा आढावा घेतला जावा.

सूत्रवजा मांडलेले हे गुणवत्ताविषयक मुद्दे अभ्यासताना व त्याबद्दलचे प्रत्यक्ष काम करताना त्यात नीट आशय भरणे हे अत्यंत गरजेचे आहे.

1. अभ्यासक्रमाची आखणी संवैधानिक मूल्यांना अनुसरून असली पाहिजे.

याचा अर्थ अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची आखणी स्वातंत्र्य, न्याय, समता, बंधुता या मूल्यांचे संवर्धन करणारी असावी. प्रत्येक बालकाशी जात, धर्म, वर्ग, रंग, लिंग इत्यादीविषयी निरपेक्ष समताभावाने शिक्षकाला वागता आले पाहिजे. बालकांच्या सामाजिक वास्तवाशी शिक्षणप्रक्रिया फटकून वागणारी नको. जात, धर्म, वर्ग, रंग, लिंग इत्यादिविषयक स्वतःच्या धारणा व व्यवहार याबाबत शिक्षकांनी चौकस राहवे एवढेच नव्हे तर या संदर्भातील स्वतःचे वर्तन समतेचे आहे अथवा नाही याचा विचार करावा ह्याशिवाय शिक्षक खऱ्या अर्थाने शिक्षणाची समृद्ध संधी निर्माण करू शकणार नाही. या समाजाला, त्यातील व्यक्तींना न्याय मिळावा, लोकशाहीचे फायदे देशातील गरिबांनाही अनुभवता यावे आणि तीत त्यांचा सहभाग असावा, यावर शिक्षकांचा विश्वास असावा. धर्माच्या नावे समाजात वाढणाऱ्या संघर्षामुळे मोठ्या प्रमाणावर हिंसा पसरते. ह्याचा सामाजिक सौहार्दावर आणि बालकांच्या जीवनावर अत्यंत वाईट परिणाम होतो. यामुळे सहकार व सौहार्द वाढेल अशा शांततापूर्ण वातावरणासाठी

प्रयत्न होणे हा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. शांततेसाठी शिक्षण या मुद्द्याला 2005 च्या शिक्षण आराखड्याने खूप महत्त्वाचे स्थान दिले आहे.

2. मुलांचा सर्वांगीण विकास साधला जाईल असा प्रयत्न असावा.

3. अभ्यासक्रमाद्वारे बालकांमधील शारीरिक व मानसिक/बौद्धिक क्षमतांचा सर्वोत्तम विकास व्हावा.

व्यक्ती म्हणून बालकातील विविध सुप्त गुणांचा विकास होणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. मन, बुद्धी व शरीर यांच्या समतोल विकासाचा प्रयत्न विद्यालयातून व्हावा.

व्यक्तिविकासासोबतच एक नागरिक म्हणून बालकाचा नीट विकास होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे समाजातील अन्य घटकांसह सहवेदनेने, सहिष्णुतेने व आनंदाने राहता यावे; यासाठी आवश्यक संवाद व वर्तन कौशल्याचा विकासही महत्त्वाचा ठरतो. बालकाच्या अवतीभवतीच्या नैसर्गिक आणि सामाजिक विश्वातील अनुभवांना व समाजात घडणाऱ्या बाबींना शालेय अध्ययन-अध्यापनाच्या प्रक्रियेत स्थान मिळायला हवे हे स्पष्टपणे नमूद केले आहे. पुस्तकातील कृत्रिम ज्ञानापेक्षा बाह्य जगात मिळणाऱ्या प्रत्यक्ष अनुभवांची समृद्धी कितीतरी पटीने अधिक असते हे शाळांनी ओळखण्याची गरज असल्याचे येथे ध्यानात आणून दिलेले आहे.

4. निसर्गतः मूल ज्ञानाची रचना करण्याची क्षमता बाळगते. त्यामुळे अभ्यासक्रमाची रचना त्याचा ज्ञानात्मक विकास करणारी असावी; त्याच्यातील सुप्त गुणांचा व कौशल्यांचा विकास करणारी असावी.

5. अध्ययन-अध्यापनपद्धती मुलांच्या उपजत कृतिशीलतेस, शोधकवृत्तीस चालना देणाऱ्या असाव्या. या पद्धतींचे नियोजन करताना व अवलंब करताना बालकांना सहभागी करून घेतले जावे व त्यांना त्या आनंददायी वाटाव्या.

6. शिक्षणाचे माध्यम हे संभवतः मुलांची मातृभाषा असावी.

शिक्षण हक्क अधिनियमात प्रारंभिक शिक्षण हे संभवतः मातृभाषेतून व्हावे असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. मातृभाषेतून मूल अधिक स्वावलंबीरीत्या शिकते; शिकण्याचा आनंदही उपभोगते, आकलनाचा वेग वाढल्यामुळे अधिक गोष्टी शिकण्याची संधी त्यास लाभते. अवांतर वाचनाची गोडी लागल्यामुळे अनुभवाची समृद्धी वाढण्याची शक्यता अधिक असते.

बहुभाषिकता ही माणसाला समृद्धच करते. शिक्षणक्षेत्रात त्रैभाषिक रचनेचा विचारपूर्वक केलेला स्वीकार योग्यच असल्याची भूमिका वेळोवेळी समित्यांनी घेतलेली आहे. भाषा जेवढी अधिक सहजतेने मुलांच्या दैनंदिन व्यवहाराचा भाग बनून शिकण्याची संधी मिळते तेवढी ती सहजतेने शिकली जाते. त्यामुळे इंग्रजीही या पद्धतीने मुलांना शिकण्याची संधी मिळाली तर चांगले. भाषाशिक्षण काही फक्त भाषेच्या अभ्यासातून होत नसते. विज्ञान,

सामाजिक, शास्त्रे, गणित यांनासुद्धा भाषा असते. भाषा म्हणजे संकल्पना. मुलांची भाषा समृद्ध होणे म्हणजे या सर्व विषयांमध्ये मूल नीटपणे अभिव्यक्त होणे. सुरुवातीची चार वर्षे मुलांना त्यांच्या घरच्या भाषेत कुठल्या दुरुस्त्यांशिवाय अभिव्यक्त होता यावे असे या आराखड्यात नमूद केलेले आहे.

7. शालेय अभ्यासक्रम व शालेय वातावरण भयमुक्त, ताणविरहित असावे जिथे मूल निर्भयपणे अभिव्यक्त होऊ शकेल.

भयमुक्त वातावरणात मुलांना शिकता येणे हा त्यांचा हक्क आहे. त्याचा अर्थच हा की प्रत्येक मुलाचा समदृष्टीने व प्रेमाने स्वीकार शिक्षकाकडून होणे गरजेचे आहे. कुठल्याही आर्थिक सामाजिक पार्श्वभूमीतील मुलांस विद्यालय ही निर्भयपणे अभिव्यक्त होण्याची जागा बनावी त्या प्रकारचा मुलाचा विश्वास शिक्षकांना संपादित करता यावा.

सरतेशेवटी हे लक्षात घ्यायला हवे की कोणताही अधिनियम परिस्थिती बदलायला मदत तेव्हाच करू शकतो जेव्हा समाजाची मानसिकता त्या अनुरूप अशी असते. अन्यथा केवळ कायद्याच्या बळावर बालकांना न्याय मिळेल ही आशा फोल ठरण्याचीच शक्यता अधिक आहे. या अधिनियमात अनेक उणिवा आहेत. त्याचप्रमाणे आपण ठरवले तर त्याचा उपयोग बालकांना केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षणच नव्हे तर समतामूलक समाजाच्या बांधणीसाठी व्यापक समाजमन तयार करण्याचे साधन म्हणूनही होऊ शकते. कोणता पर्याय स्वीकारायचा हे आपल्याला ठरवायचे आहे.

8. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाद्वारे मुलांची समज, ज्ञान व उपयोजन-क्षमतांचा आढावा घेतला जावा.

पाठांतराला अतोनात महत्त्व देणारी व त्याच क्षमतेची परीक्षापद्धतीतून तपासणी करणारी व्यवस्था मुलांवर ताण विनाकारण वाढवते. स्पर्धात्मकतेमुळे परीक्षांचा भारही वाढत जाऊन शिक्षण रसहीन होऊ लागले आहे. पण आज ज्ञानरचनावादाची बैठक असलेल्या बालकेन्द्री शिक्षणपद्धतीचे महत्त्व आपण समजून घ्यायला हवे. मूल प्रत्यक्ष अनुभवातून शिकते. मूर्ताकडून अमूर्ताकडे त्याच्या संकल्पनांचा विकास होतो, मूल अवगत संकल्पनाच्या साहाय्याने नव्या परिस्थितीस सामोरे जाऊन नव्या संकल्पना जाणून घेते. याची जाण शिक्षकांनी अध्यापन योजना करताना ठेवणे आवश्यक आहे. गणित विज्ञानासारख्या विषयांचे अध्यापन करताना याचे भान विशेषत्वाने ठेवले जायला हवे; साधनांची निर्मिती व निवड काळजीपूर्वक केली जायला हवी. प्रयोगशीलतेस वाव मिळेल अशी पाठयोजना करण्याचा शिक्षकाचा प्रयत्न असायला हवा. अवतीभवतीच्या जगात घडणाऱ्या गोष्टींमागील कार्यकारणभाव जाणून घेण्याच्या वृत्तीस शिक्षकांकडून चालना मिळावी.

प्रत्येक मुलांस विविध बुद्धिमत्तांचा पट लाभलेला असतो, प्रत्येकाची शिकण्याची पद्धत व गती वेगवेगळी असते, त्याचे पूर्वानुभव वेगळे असतात. आकलनाची अभिव्यक्तीदेखील वेगवेगळ्या प्रकारची असते. त्यामुळे अध्यापनात वैविध्य आणून मुलांना अधिक चांगल्या

रीतीने मदत केली जाऊ शकते. मुलांचा सक्रिय सहभाग (वैचारिक स्तरावरही) घेऊन वर्गपातळीवर अधिक गुणवत्तापूर्ण वातावरणाची निर्मिती होऊ शकते. संकल्पनांचा उपयोग जेव्हा जीवन व्यवहारात वा अवतीभवती घडणाऱ्या संदर्भात करण्याची संधी मुलांना लाभते तेव्हा ज्ञानाचा स्तर उपयोजनाच्या पातळीवर जातो; आकलन अधिक अर्थवाही व टिकावू स्वरूपाचे होते, बालकाला शिक्षणाची अर्थपूर्णता जाणवल्यामुळे शिकण्याचा आनंद मिळतो. मूल्यमापनात लेखीसोबतच तोंडी आणि प्रत्यक्ष कृतीवर आधारित किंवा कौशल्यावर आधारित सातत्यपूर्ण मूल्यमापनाच्या पद्धतींचा अवलंब करायला हवा.

आनंद निकेतन, नई तालीम समिती, सेवाग्राम, जिल्हा वर्धा 442102

■■

वर्गांतर्गत प्रक्रियेची गुणवत्ता

नीलेश निमकर

'शिक्षणाची गुणवत्ता' याची नेमकी व्याख्या करणे अवघड असले तरी गुणवत्तेची एक ढोबळ कल्पना आपल्या सर्वांच्याच मनात असते. त्या कल्पनेत शाळेतील भौतिक सुविधांपासून ते मुलांच्या यशापयशापर्यंतच्या अनेक बाबींचा समावेश असतो. आपल्या मनातल्या कल्पनेच्या आधारेच आपण शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत, समाधान, असमाधान, चिंता वगैरे व्यक्त करत असतो. गुणवत्तेच्या या आपल्या कल्पनेत मुलांना कसे शिकवले जावे, वर्गातले वातावरण कसे असावे, शिक्षक आणि विद्यार्थी यांचे सबंध कसे असावेत याबाबतच्या धारणांचाही समावेश असतो. या मांडणीपुरते आपण या सगळ्या धारणांना एकत्रितपणे वर्गांतर्गत प्रक्रिया असे म्हणूया आणि गुणवत्तापूर्ण वर्गांतर्गत प्रक्रियेची काही ढोबळ लक्षणे काय असू शकतील याचा शोध घेऊया. अर्थातच हा शोध आपल्याला आधुनिक शिक्षणशास्त्रातील काही तत्त्वांच्या आधारे घ्यायचा आहे .

अ. भयमुक्त वातावरण : गुणवत्तापूर्ण वर्गांतर्गत प्रक्रियेची पूर्वअट

शिकण्याचे काम विचार करण्याशी निगडित आहे. विचार करण्याचे काम मेंदूच्या काही विशिष्ट भागात चालते. जर आपल्याला भीती वाटली तर विचाराचे काम करणाऱ्या मेंदूच्या भागाचे काम तात्पुरते बंद किंवा मंद होते. परिणामतः मुलांची शिकण्याची प्रक्रियासुद्धा तात्पुरती कुंठित होते. शिकताना समजा एखादी चूक झाल्यामुळे जर मुलाला कोणी ओरडले वा धाक घातला तर जे येत असते तेही मूल चुकीचे करू लागते असा अनुभव आपल्यापैकी अनेकांना आला असेल. याचे मुख्य कारण हे म्हणजे ओरडल्याने वा धाक घातल्याने येणारी भावनिक अस्थिरता आणि त्यामुळे थांबणारी विचारप्रक्रिया हेच आहे. वर्गात जर भीतीचे वातावरण असेल तर मुले विचार करू शकणार नाहीत आणि पर्यायाने शिकणार नाहीत. अर्थातच गुणवत्तेला बाधा येईल.

वर्गात मुलांना कशाची भीती वाटू शकते याचा शिक्षक म्हणून आपण शोध घेणे महत्त्वाचे ठरेल. शारीरिक शिक्षांची भीती हा तर उघडच भाग आहे, त्यामुळे अशा शिक्षा टाळायला हव्यातच. मात्र मुलांनी केलेल्या चुकांबद्दल त्यांना लागेल असे बोलणे किंवा अपमान वा चेष्टा करणे कटाक्षाने टाळायला हवे. शिकताना एखादी चूक झाल्यास इतर मुलांकडून चेष्टा केली जात नाही ना याकडेही शिक्षक म्हणून लक्ष देणे गरजेचे आहे. खरे तर शिकताना चुका करण्याचा मुलांचा हक्क आपण मान्य करायला हवा आणि तो अबाधित राखण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत. भावनिक स्थिरता असल्याविना मुले शिकती होणार नाहीत हे तत्त्व पारंपरिक छडी लागे छमछम या तत्त्वाच्या अगदी विरुद्ध आहे याचे भान येणे व त्यातून वर्गात विश्वासाचे वातावरण तयार होणे, हे गुणवत्तापूर्ण शिक्षणप्रक्रियेकडे टाकलेले पहिले पाऊल असेल.

मुलांच्या चुकांकडे त्यांच्या शिक्षणातील एक पायरी म्हणून पाहायला हवे

मूल शिकत असताना जेव्हा चुका करते तेव्हाही ते काही विचार करत असते. हा विचार समजून घेणे शिक्षक म्हणून महत्त्वाचे आहे. कारण हा विचार समजला तर चुका सुधारणे कठीण राहणार नाही. मात्र यासाठी शिक्षकाने फारच सजग असावे लागते. चुका करण्यामागचा त्यांचा विचार कसा समजून घेता येईल हे आता एका उदाहरणाच्या मदतीने समजून घेऊ.

आ. मुलांच्या घरच्या भाषेचा स्वीकार

शिकण्याची प्रक्रिया ही विचार करण्याशी जवळून जोडलेली आहे हे आपण पाहिले. आपला बहुतेक सारा विचार भाषेच्या माध्यमातून होतो. एका विशिष्ट वयात मूल परिसरात बोलली जाणारी भाषा अगदी नैसर्गिकपणे अवगत करते. आपण या भाषेला मुलाची घरची भाषा असे म्हणू. सामान्यपणे शाळेत शिक्षणाचे माध्यम म्हणून वापरली जाणारी भाषा ही त्या त्या राज्याची प्रमाण बोली किंवा संपर्क भाषा असते किंवा इंग्रजीसारखी एखादी परभाषा देखील असते. शाळेत माध्यम म्हणून वापरल्या जाणाऱ्या भाषेला आपण शाळेतली भाषा म्हणू या. शाळेत माध्यम म्हणून वापरली जाणारी भाषा ही मुलाची घरची भाषा असेलच असे नाही. आदिवासी भागात घरची भाषा आणि शाळेतली भाषा यात बरेच अंतर असते. अशा परिस्थितीत घरच्या भाषेकडून शाळेतल्या भाषेकडे येण्यासाठी मुलांना अवधी तर द्यावा लागतोच, शिवाय मदत पण करावी लागते. यात सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपण घरच्या भाषेचा आदर आणि स्वीकार करणे. सुरुवातीच्या तीन चार वर्षांत बोलण्यात वा लेखनात प्रमाण भाषेचा आग्रह न धरता अभिव्यक्तीला महत्त्व देणे गरजेचे आहे. काही उदाहरणांच्या आधारे हा मुद्दा आपण थोडा विस्ताराने पाहू या:

'माकडाने लाकूड कशाने कापले ?' या प्रश्नाचे उत्तर वारली मुलाने ''लाकूड करवती खाल कापेल.'' असे दिले वा लिहिले तर ते स्वीकारायला हवे. मुलाच्या घरच्या भाषेत हे वाक्य पूर्णपणे स्वीकारार्ह आहे. तुम्ही काल रात्री काय करत होतात ? याचे उत्तर ''काल रातचे आमी जान्यामामासांचे पत्ते खेलत'' असे मिळाले तर वाडा तालुक्याच्या पूर्व भागात हे

पूर्ण वाक्यातील बरोबर उत्तर मानायला हवे. कारण मराठीच्या प्रमाण बोलीसारखी 'खेळत होतो' 'जात होतो' अशी क्रियापदांची जोडी या भागातल्या मराठी बोलीत ऐकायला मिळत नाही. वाक्य 'खेलत' वा 'जात' पाशीच संपते. अजून एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मुलांचे आयुष्य शाळेत दाखल झाले पाहिजे. यासाठी त्यांच्या आसपास दिसणाऱ्या घडणाऱ्या घटनांबाबत आपण मुलांना बोलते व लिहिते करायला हवे. गावात येणारा भंगारवाला, अनारकलीवाला, मासेवाली या सर्वांबाबत मुले भरभरून लिहितात व त्यांचे हे अनुभव अतिशय रसरशीतपणे मांडतात, असा अनुभव आहे. नमुन्या दाखल पुढील लिखाण पाहा.


अमच्या पाड्यात एक भंगारवाला येतो तो टपो घेऊन येतो
आणि रस्त्याच्या दुकान बसून टपो घालतो तो भंगारवाला पाड्यात येतो
आणि सगळ्या लोकांना आवाज देतो तो आवाज देतांना पंचार आणा
कांदे, बटाटे, लसून आणा म्हणी ध्या असतो भंगारवाला आवाज देतो
त्याला आपण मोडलेल्या बुधी, पत्रे घेऊनी दिले कि त्याचे लहान लहान
तुकडे असते आणि त्या तराजूत ठेवतो एका तराजूत आपन त्याला दिलेली वस्तू ठेवे
आणि एका तराजूत वजन ठेवतो आणि त्या दोघांचे वजन समान करतो.
वजन समान केल्यानंतर आपन दिलेली वस्तू त्यांच्या दोघात ठेवतो आणि वजन
असते ते त्या तराजूतच ठेवतो त्यांना आपलयाला सांगितले कि तुमची
दिलेल्या वस्तूचा आणि वजनाचा समान वजन केले आहे वजन तराजूतच
ठेवले मग तो सांगतो आता तुमच्या नाव पाडीतोच आपण सांगितले
बटाटे द्या की तो लगेच बटाट्याचे वजन करून देतो आणि त्याच्याकडे
माल थोडे थोडे जास्तच असतात तो भंगारवाला हिंदी आणि मराठी या
दोन्ही भाषा बोलतो.
नाव - प्रमिला रविंद्र वारघा

मुलांच्या घरच्या भाषेचा वापर व स्वीकारण्याबाबत काही जण म्हणतात की मुलांना तशी (घरच्या भाषेत लिहिण्याची) सवय लागली तर पुढे प्रमाणभाषेत ती कशी लिहू शकतील? हा दृष्टिकोण 'भाषा ही फक्त सवय आहे' या समजेवर आधारित आहे. खरे तर एकदा मुलांची भाषा या चिह्नव्यवस्थेची समज नीट विकसित झाली की मग प्रमाण बोलीचा व प्रमाण लिखाणाचा हळूहळू परिचय करून देता येतो. साधारणपणे पाचवीत येईपर्यंत आपल्या घरात बोलली जाणारी भाषा ही शाळेच्या पुस्तकाल्या भाषेपेक्षा वेगळी आहे, याची समज विकसित झालेली असते. अर्थातच यासाठी शिक्षकाने मुलाच्या भाषाविकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. समज विकसित झाली की बहुदा मुले आपसूकच दोन्ही भाषांचा वापर त्या त्या परिस्थितीत करू लागतात. आदिवासी मुलांच्या निवासी शाळेत चार पाच वर्षे घालवलेली मुले आपापसात वारलीत आणि पाहुण्यांशी मराठीच्या प्रमाणबोलीत बोलताना दिसतात.

मुलाच्या भाषेचा आणि पर्यायाने व्यक्तिमत्त्वाचा आदर हे गुणवत्तापूर्ण वर्गांतर्गत प्रक्रियेचे महत्त्वाचे लक्षण आहे.

इ. मुलांचा परिसर व शिक्षण यांची जोडणी

मुले ज्या परिसरात राहतात त्याच्याशी जोडून घेणे हे गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्वाचे लक्षण आहे. अशा जोडणीमुळे मुलांना वास्तवाचे भान येते. त्यांच्या शिक्ण्याला एक संदर्भ मिळतो. स्वतःच्या परिसराशी जोडून घेणे म्हणजे काय हे एका उदाहरणाद्वारे समजून घेऊ. ठाणे जिल्ह्यातील दाढरे नावाच्या छोट्याशा गावातील शाळेच्या विद्यार्थ्यांनी नैसर्गिक संसाधने व ऊर्जाबचत हा भाग शिकताना गावाच्या पातळीवर वीज आणि रॉकेलची बचत कशी करता येईल याचा अभ्यास करायचे ठरवले. गावातील प्रत्येक घराचे सर्वेक्षण करून त्यांनी माहिती गोळा केली. जर गावातले टंगस्टनचे दिवे बदलून सी.एफ.एल. दिवे वापरले तर किती ऊर्जा बचत होईल याचे गणित घातले. वीज नसताना गावात वापरण्यात येणाऱ्या 12 प्रकारच्या बत्ती व वात (तीन प्रकारच्या बत्त्या व चार प्रकारच्या वाती) यांच्या जोडीतील कोणती जोडी सर्वांत कार्यक्षम आहे हे शोधून काढले. कार्यक्षम बत्तीस साध्या बत्तीच्या पन्नास टक्के केरोसीन लागते हे प्रयोगाने दाखवून दिले आणि आपले म्हणणे ग्रामसभेसमोर मांडून लोकांना टंगस्टन दिवे व बत्त्या बदलण्यास प्रवृत्त केले. या सर्व प्रक्रियेतील मुले गणित व विज्ञानातील अनेक संकल्पना तर शिकलीच पण त्याचबरोबर आपले म्हणणे लेखी व तोंडी मांडणे, एका छोट्या बदलासाठी का होईना लोकांना प्रवृत्त करणे त्यासाठी पुढाकार घेऊन नेतृत्व करणे या बाबीही त्यांनी अवगत केल्या.

मुलांच्या या प्रयत्नाला दाद मिळाली आणि त्यांनी आपल्या छोट्याशा गावाहून थेट राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेच्या राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली. या स्तरावर त्यांना पॅन आय आय टी अलुम्यनाय या संस्थेचे पारितोषिकही मिळाले. आपल्या परिसरातील समस्येचा शास्त्रीय अभ्यास करण्यातून मुलांचे जे शिक्षण झाले ते कदाचित अनेक तासांच्या भाषणांतून वा परीक्षा देऊनही झाले नसते. म्हणून शिक्षणाची जोडणी परिसराशी करायलाच हवी.

ई. समजून-उमजून शिकण्यावर भर

एखादी गोष्ट शिकताना ती मुळापासून समजून घेण्यावर भर देणे आवश्यक आहे. याचा नेमका अर्थ काय हे आपण भूगोलातील एका उदाहरणाच्या आधारे पाहू या. चंद्राच्या परिवलनाचा आणि परिभ्रमणाचा काळ एकच असल्याने चंद्राची एकच बाजू आपल्याला दिसते'' हे पाठ्यपुस्तकातील वाक्य मुळापासून समजून घेण्यासाठी काय काय समजावे लागेल याची यादी पुढे दिली आहे.

1. परिवलन म्हणजे स्वतःच्या आसाभोवती फिरणे हे समजण्यासाठी पंखा चाक यासारख्या वस्तूंच्या आधारे आस ही संकल्पना समजून घ्यावी लागेल. अशाप्रकारे फिरणाऱ्या सर्वच वस्तूंचा आस कसा व कुठे आहे याची कल्पना यावी लागेल. स्वतःभोवती फिरणाऱ्या माणसाचा आस कसा व कुठे आहे हे कळावे लागेल.

2. परिभ्रमण म्हणजे एखादी वस्तू दुसऱ्या एखाद्या वस्तूभोवती फिरणे ही कल्पना समजून घ्यावी लागेल. एखादी वस्तू स्वतःभोवती फिरत-फिरत दुसऱ्याभोवती फिरते म्हणजे कसे ते समजून घ्यावे लागेल.

3. प्रदक्षिणेसारखे उदाहरण घेऊन देवळाभोवती फेरी मारता मारता आपण त्याच वेळात स्वतःभोवतीही एक फेरी पूर्ण करत असतो हे लक्षात घ्यावे लागेल.

4. मग या सर्व बाबींचा वापर करून चंद्र पृथ्वीभोवती कसा फिरतो याचे एक प्रतिमान डोळ्यांसमोर आणावे लागेल आणि मग चंद्राची एकच बाजू आपल्याला का दिसते याचे कारण खऱ्या अर्थाने कळेल.

या सर्व बाबींचा विचार केला तर पाठ्यपुस्तकातले एखादे कळीचे वाक्य उलगडून दाखवण्यासाठी कुशलतेने तयार केलेले, समजेवर भर देणारे शिकवण्याचे नियोजन लागेल. अशा प्रकारचे अध्ययन अनुभव रचणे हे गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्वाचे लक्षण आहे.

उ. मुलांच्या चुका शिकण्यातील अनिवार्य पायरी

शिकताना मुले जेव्हा चुका करतात तेव्हादेखील ती विचार करत असतातच. जेव्हा मुलाची चूक होते तेव्हा त्याने नेमका काय विचार केला आहे हे शिक्षकाने समजून घेणे गरजेचे आहे. कारण हा विचार जर समजला तर चुकांची दुरुस्ती करणे सहज शक्य होते. मुलाने चूक करताना केलेला विचार कसा समजून घेता येईल हे आपण एका उदाहरणाधारे पाहू या.

1. आकृतीत रंगवलेला भाग हा वर्तुळाचा किती भाग आहे ते अपूर्णांकात लिही.



$\frac{1}{3}$

वरील मुलाने चुकीचे उत्तर दिले आहे. असे लक्षात आल्यावर शिक्षकांनी त्याला तुला असे का वाटते? असा प्रश्न विचारला. मुलाने लिहिलेल्या उत्तरावरून त्याने रंगवलेला भाग अंश म्हणून तर न रंगवलेले 3 भाग छेद म्हणून दाखवले आहेत हे सहजच लक्षात येईल. एकदा नेमकी काय गडबड आहे हे कळले तर मग मुलाला मदत करणे सहज शक्य होईल मात्र त्यासाठी मुलाला केवळ चूक बरोबर न ठरवता, त्याचा विचार समजून घ्यायला हवा. गुणवत्तेच्या वाटेवर चालणाऱ्या शिक्षकाला खरे तर बरोबर उत्तरांपेक्षा चुकीच्या उत्तरांत जास्त रस असायला हवा.

ऊ. वाचन-लेखनावर प्रभुत्व

वाचन आणि लेखन ही औपचारिक शिक्षणाची साधने आहेत. आपल्या अभ्यासक्रमानुसार शाळेच्या पहिल्या दोन वर्षांत मुलांनी वाचन लेखनावर चांगले प्रभुत्व मिळवणे आवश्यक आहे. हे प्रभुत्व जर दुसऱ्या वर्षापर्यंत आले नाही, तर मुले औपचारिक शिक्षणात मागे पडण्याचा धोका निर्माण होतो. वाचलेले समजत नाही म्हणून पाठ करावे लागते व स्वतःहून लिहिता येत नाही, म्हणून पाहून लिहावे लागते. वाचन-लेखनावर प्रभुत्व

मिळवण्यासाठी पद्धतशीर कार्यक्रमाची आखणी करणे अत्यावश्यक आहे.

वाचन म्हणजे अर्थ लावणे (meaning making) असते. अर्थ न लावता वाचण्याला वाचणे म्हणता येणार नाही. त्यामुळे समजून वाचताना मूल दोन वेगवेगळ्या प्रक्रिया एकाचवेळी करत असते. लिपीच्या माध्यमात लिहिलेल्या संदेशातून अर्थ काढत असते आणि आपण काढलेला अर्थ योग्य आहे का, हेदेखील तपासून घेत असते. त्यामुळे वाचनाची प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची आहे. तिच्यावर प्रभुत्व हळूहळू येते आणि त्यासाठी विचारपूर्वक प्रयत्नही करावे लागतात.

लिहिताना मुलाला आधी मनात आपल्या विचाराचे संयोजन करावे लागते व त्यानंतर लिपीचा वापर करून आपले म्हणणे कागदावर उतरवावे लागते. ही प्रक्रियाही जटिल आहे. त्यामुळे शिक्षणाचा जिना चढताना मुलाला या पहिल्या पायऱ्यांवर ठेच लागणार नाही. याची खबरदारी घेणे गुणवत्तेचे महत्त्वाचे लक्षण आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणात शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कारण रोज वर्गात काय घडणार हे शिक्षकावर अवलंबून आहे. शिक्षकाने आपले ज्ञान अद्यावत ठेवणे त्यासाठी गरज लागेल तेथे तंत्रज्ञानाचा आधार घेणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी शिक्षक म्हणून आपल्याला सतत शिकते राहायला हवे आणि मुख्य म्हणजे मुलांवर नितांत प्रेम असायला हवे. तरच या कामातील जबाबदारी व कष्ट आपण निभावू शकू.

231, वडवली रोड, मु.पो.सोनाले, ता. वाडा, जिल्हा ठाणे 421303

■■

गुणवत्तापूर्ण शिक्षण : कार्यकर्त्यांपुढील आह्वाने

गिरीश सामंत

शिक्षणाचा हक्क देणारा 2010 चा अधिनियम गुणवत्तेला पुरेसा न्याय देत नसला तरी NCERT, SCERT च्या माध्यमांतून त्या दिशेने काही प्रयत्न सुरू झाले आहेत हे मान्य करावे लागेल. तसेच अनेक ठिकाणी शिक्षणप्रेमी ह्या कामाला सजगपणे हातभार लावत आहेत. जागृती निर्माण करायचा प्रयत्न करत आहेत, हीसुद्धा मोठी जमेची बाजू आहे. परंतु कोणत्याही कामाचा झोत ठरवताना किंवा व्यूहरचना करताना मर्यादा (constraints) आणि संभाव्य अडचणी लक्षात घेणे उचित ठरते. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संदर्भात ते काम या लेखाद्वारे करण्याचा प्रयत्न केला आहे. 1999-2000 पासून सुरू झालेल्या आमच्या बालवाडी व प्राथमिक विभागात गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. त्यात बऱ्यापैकी यश आले असे आम्ही म्हणू शकतो. तो अनुभव गाठीशी धरून हा लेख लिहिला आहे. शिक्षकांचे प्रशिक्षण, अध्ययन व अध्यापनाच्या संदर्भातील अडचणींना विशेष महत्त्व आहेच. परंतु याव्यतिरिक्त इतर अनेक बाबीसुद्धा महत्त्वाच्या ठरतात. त्यांचा विचार केला

नाही तर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रयत्न अपुरे पडतील. त्या कामाला वेग येणार नाही. अश्या काही अडचणींचा विचार येथे करीत आहे. मर्यादित उद्दिष्टांनुसार केवळ अडचणींचा विचार येथे केला असल्यामुळे हा निराशावाद नाही, हे वाचकांनी लक्षात घ्यावे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शिक्षक : गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे नेमके काय याबाबत सोप्या पद्धतीने समजावून सांगणे कठीण आहे. त्यासाठी NCF 2005 हा आधार असला तरी त्यांत सांगितलेले सर्व समजून घेऊन ते कोण व कसे अंमलात आणणार? तसेच भौगोलिक, सामाजिक, आर्थिक अशा अनेक कारणांमुळे संपूर्णपणे भिन्न परिस्थितीतून आलेल्या मुलांच्या वेगवेगळ्या गरजांनुसार 'अपेक्षा' निश्चित करून गुणवत्तेचे स्वतंत्र निकष कसे लावायचे? त्यासाठी समज असणारे ताकदीचे पुरेसे शिक्षक आज उपलब्ध नाहीत. मूल का शिकत नाही, असा प्रश्न शिक्षकांना पडत नाही. कारण तसा विचार करण्याची त्यांना आजवर आवश्यकता वाटली नाही. केवळ पुस्तक शिकवणे, स्वाध्याय सोडवून घेणे आणि त्यावर आधारित परीक्षा घेऊन गुण देणे, इतके मर्यादित काम शिक्षक करत असतात. गुणवत्ता म्हणजे काय, हे समजून घेण्यासाठी त्यांना विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत. त्यासाठी जास्तीचा वेळही द्यावा लागेल. चाकोरी सोडून नवीन मार्ग शोधावे लागतील. हळूहळू काम करत करत शिक्षकांना ते सर्व समजून घेता येणे शक्य असले तरी या सर्व कामांसाठी लागणारी मानसिकता आणि मूल व शिक्षण या गोष्टींकडे बघण्याचा पोषक व सकारात्मक दृष्टिकोण आज अनेक शिक्षकांकडे नाही हे मान्य करावे लागेल. गुणवत्ताविकासासाठी ही एक प्राथमिक अडचण आहे, असे आग्रहपूर्वक नमूद करावे लागत आहे. त्यामुळे गुणवत्ताविकासाचे कोणतेही काम करताना शिक्षकांच्या मानसिकतेत व त्याच्या दृष्टिकोणात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा हेतू सतत मनात बाळगावा लागेल. काय झाले तर माणसाला प्रेरणा मिळते, हे सांगणे कठीण असले, तरी त्यासाठी सजगपणे प्रयत्न करत राहिल्यास सकारात्मक बदल होऊ शकतात असा आमचा अनुभव आणि विश्वास आहे.

प्रत्येक शिक्षक असामान्य असेल अशी अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही. पूर्वी प्रत्येक विषयाचा एक तरी व्यासंगी, जाणकार व तज्ज्ञ शिक्षक प्रत्येक शाळेत असायचा. त्याच्या मार्गदर्शनाखाली इतर शिक्षक तयार होत असत. स्वतःच्या क्षमता वाढवीत असत. आज तसे घडताना दिसत नाही. कारण प्रज्ञावान या पेशाकडे येत नाहीत हे एक कटू सत्य आहे. येणाऱ्या शिक्षकांच्या शिक्षणाबद्दलच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट नसतात. हेतूची स्पष्टता त्यांना नसते. त्यांचे शिक्षण केवळ पुस्तकी असून विषयज्ञान, समज आणि वैयक्तिक क्षमताही बरेचवेळा बेताची असते. वाचन, छंद, व्यासंग या बाबतीतली परिस्थिती समाधानकारक नसते. या सर्वांसाठी केवळ शिक्षकांना जबाबदार धरता येणार नाही. त्यांना जसे शिक्षण मिळाले, तसेच ते शिकवणार.... पाठांतर, परीक्षातंत्र, काही पोर्शन ऑप्शनला टाकणे... Product of a system cannot be better than the system itself. स्वतंत्र विचार करायची सवय त्यांना त्यांच्या शालेय जीवनात लागलेली नसते.

उत्तम नेतृत्वगुण असलेले कार्यक्षम मुख्याध्यापक सहसा मिळत नाहीत. शिक्षकांचे

प्रशिक्षणही परिणामकारक व अर्थपूर्ण नसते. (हा एक महत्त्वाचा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे.) त्यांच्यावर अशैक्षणिक कामांचा बोजाही असतो. तसेच शिक्षक-विद्यार्थीप्रमाणही अनुकूल नसते. अशा अनेक कारणांमुळे शिक्षकांना चाकोरीतून जाणे सुरक्षित वाटते. गुणवत्ता वाढवण्यासाठी धोके पत्करण्याची, त्यासाठी मेहनत करायची त्यांची सहसा तयारी होत नाही. या अडचणी दूर करण्यासाठी चालक, सुज्ञ पालक आणि शिक्षणप्रेमींनी मार्ग शोधले पाहिजेत. शिक्षकांबरोबर काम करून त्यांना त्यांच्या कामात मदत केली पाहिजे. शाळेत पोषक वातावरण राखण्यासाठी प्रयत्न करायला हवेत आणि नाउमेद न होता या सर्वांचा सातत्याने पाठपुरावा केला पाहिजे.

याचबरोबर आणखी एक उल्लेख करणेही आवश्यक वाटते. तो म्हणजे, काही शिक्षकांचा दृष्टिकोण व त्यांची मानसिकता चांगल्या शिक्षणाला पोषक तर नसतेच, पण बरेचवेळा ती मारक ठरते. अतिसुरक्षिततेमुळे त्यांच्यात काम टाळण्याची प्रवृत्ती बळावते. आपली जबाबदारी ओळखून ती स्वीकारायची त्यांची तयारी नसते. त्याची गरज त्यांच्या लक्षातच येत नाही. कार्यक्षमतेची सांगड वेतनाशी घातलेली नसल्याचाही हा एक परिणाम आहे. अशा शिक्षकांचा विरोध पत्करूनही पुढे जाण्याची हिम्मत इतर शिक्षकांमध्ये तयार होण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील.

चालकांची भूमिका : चांगले काम करण्यासाठी प्रेरणा (motivation) आवश्यक असते. शिक्षकांना केवळ दोष देण्याऐवजी त्यांना प्रेरणा मिळावी म्हणून संस्थाचालकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. त्यांनी स्वतः शिक्षणविषयक विचार समजून घ्यायला हवा. शिक्षकांना अनुभवाच्या नवीन संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात, शिक्षकांना गुणवत्तेबाबत स्पष्ट अशी उद्दिष्टे ठरवून द्यायला हवीत. त्याबद्दल अपेक्षा व्यक्त करायला हव्यात. चालक स्वतः या बाबतीत अनभिज्ञ असले, तर ते शाळेची शैक्षणिक धोरणे कशी ठरवू शकतील? शाळा चालवायची असेल, तर ती चांगली चालण्याची व शाळेत चांगले शिक्षण देण्याची जबाबदारीसुद्धा चालकांनी घेतली पाहिजे. दुर्दैवाने असे घडताना क्वचितच दिसते. शाळेच्या शैक्षणिक कामांत चालकांचा सहभाग नसतो किंवा सहकार्यही नसते. अनेक वेळा त्यांचा स्वतःचाच दृष्टिकोण सकारात्मक नसतो. चालकांकडून सहभाग, सहकार्य आणि मार्गदर्शन मिळाले तर शिक्षकांच्या कामाला गती येईल हे निश्चित. त्यामुळे गुणवत्तेबाबत काम करताना चालकांच्या प्रबोधनाचाही विचार करणे आवश्यक ठरते.

सरकार : गुणवत्ताविकासाच्या कामात सरकारला महत्त्वाची भूमिका निभवावी लागेल यात शंका नाही. काही प्रयत्न सुरू झाले असले तरी खूप काही करायचे बाकी आहे. हे लक्षात घ्यावे लागेल आणि तेही वेगाने करावे लागणार आहे. आज शासनाकडे गुणवत्तेबाबत आणि एकंदरीत शिक्षणाबद्दल धोरणात्मक स्पष्टता व सातत्य नसल्याचे ठळकपणे जाणवते. सरकारी यंत्रणा व संस्थांमध्ये (NCERT, SCERT, DIET, BRC, URC, MIEPA, MPSP, SSC & HSC Boards etc.) पुरेशा समन्वयाचा, एकसूत्रतेचा व नियंत्रणाचा अभाव दिसून येतो. त्या त्या संस्थांच्या भूमिकांमध्ये अधिक स्पष्टतेची आणि कामांमध्ये समन्वयाची

गरज आहे. तसेच 'मातृभाषेतून शिक्षण' हे सरकारने जाहीर केलेले धोरण असले तरी प्रत्यक्षात मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडतील असे निर्णय शासन सातत्याने घेत आहे. कायदेशीर जबाबदारी असूनही सरकार शिक्षणसंस्थांना पुरेसा निधीही देत नाही. राजकीय हस्तक्षेप व अशैक्षणिक विचारांना स्थान हे या दुरवस्थेमागचे एक महत्त्वाचे कारण आहे.

पालक व समाज : आज समाजातील कोणत्याही क्षेत्रात गुणवत्तेची व दर्जेदार कामाची मागणी होत नाही. सर्वत्र उथळपणा बोकाळला आहे. सुमार असलेले खपवून घेतले जाते. 'जगात असेच चालते' हा समज पक्का झाला आहे. आपण आपल्या कामाच्या जबाबदाऱ्या ओळखून त्या स्वीकारीत नाही. स्वतःच्या कामाचा आपण अभिमान बाळगत नाही आणि झालेल्या चुकांची आपल्याला खंतही वाटत नाही. समाजाची अशी धारणा, विचारांची दिशा व पद्धत ही गुणवत्तेला पोषक नाही. समाजाच्या या मानसिकतेचे प्रतिबिंब शिक्षणक्षेत्रातही पडलेले स्पष्टपणे दिसते.

पालकांना नोकरी किंवा व्यवसायासाठी फक्त प्रमाणपत्र, इतरांपेक्षा जास्त गुण व त्यासाठी परीक्षातंत्र हवे असते. त्यांना गुणवत्तेशी, समज तयार होण्याशी किंवा शिक्षणाच्या मूळ उद्दिष्टांशी काही देणेघेणे नसते. त्यांना गुणवत्तेची गरज भासत नाही, असे खेदाने म्हणावे लागते. पालक गुणवत्तेबाबत सजग नसल्यामुळे तशी मागणी करीत नाहीत. परंतु इंग्रजी माध्यमासारख्या भ्रामक कल्पना मात्र जनमानसात ठामपणे रुजल्या आहेत. फाडफाड इंग्रजीबरोबरच, जे जे झगमगीत असेल ते ते चांगले, असा समज समाजात जाणीवपूर्वक करून दिला जात आहे. अशा परिस्थितीत गुणवत्तेची मागणी नसल्यामुळे पुरवठाही नाही, अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रमाणपत्राची मागणी प्रचंड असल्यामुळे परीक्षातंत्र देणारे शिकवणीवर्ग मात्र फोफावले आहेत. ते गुणवत्तेला मारक अशी शिकवण देतात व तसा प्रचारही करतात. त्याचा विपरीत परिणाम होतो. गुणवत्तेसाठी पालकांकडून दबाव येण्याकरिता याविषयी जनजागृती करणे हा ह्या कामाचा महत्त्वाचा भाग समजावा लागेल. तसेच हा जाहिरातबाजीचा जमाना असल्यामुळे हे काम आक्रमकपणे आणि वेगवेगळ्या माध्यमांतून कसे करता येईल, तेही विचारपूर्वक ठरवावे लागेल.

इतर काही बाबी : रोजच्या जीवनात आणि विशेषतः शिक्षणक्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. त्या बदलांचा वेगही प्रचंड आहे. त्या वेगाशी जुळवून घेणे सर्वांनाच अवघड ठरत आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे वेगाने येत असणाऱ्या नवीननवीन ई-साधनांचा व उपकरणांचा वाढता प्रभाव शिक्षणक्षेत्रातही दिसू लागला आहे. केंद्रसरकारने 'आकाश' नावाचा टॅब्लेट पीसी आणला आहे. 'आकाश'च्या 22 कोटी प्रती लागणार आहेत असे कळते. मुंबई विद्यापीठाने आताच 30 हजारांहून जास्त टॅब्लेट पीसींची मागणी केली आहे. हे लोण शालेय स्तरावर यायला वेळ लागणार नाही. शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी 'यू ट्यूब'ने नवीन सेवा सुरू केली आहे. India Can Education Pvt. Ltd. सारख्या अनेक कंपन्या अस्तित्वात आल्या असून त्या e-learning साठी प्रत्येक वर्गात interactive यंत्रणा बसवून देतात. यासाठी लाखो रुपये खर्च होतात. मुलांकडून त्यासाठी भरमसाठ शुल्क आकारले

जाते. या साधनांमुळे अध्ययन व अध्यापन सुलभ होईल असा त्यांचा दावा आहे. त्यासाठी वापरले जाणारे प्रोग्रॅम्स् मात्र उथळ असल्याचे प्रथमदर्शनी जाणवते. त्यांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. अशा साधनांची मदत घ्यायची नाही, असे नाही. पण आंधळ्या मनाने त्यांचा वापर व्हायला नको. या साधनांमुळे मुलांचे आकलन वाढणार आहे की तेही वरवरचे शिक्षण असणार? अशा साधनांचा समजून वापर करणारे शिक्षक हवेत. ही साधने वापरली की चांगले शिक्षण मिळते असा चुकीचा समज रूढ व्हायला वेळ लागणार नाही. आक्रमक जाहिरातबाजीमुळे मुंबईत 200 शाळांमध्ये अशा यंत्रणा बसवून घेण्यात आल्याचे कळते. गैरसमजुतीमुळे उद्या पालकही इंग्रजी माध्यमाप्रमाणेच अशा साधनांची मागणी करू लागतील. ज्या शाळेत या सोयी उपलब्ध आहेत, ती शाळा चांगली अशी पालकांची धारणा होऊ लागली तर आश्चर्य वाटायला नको. गुणवत्ताविकासाच्या कामातला हा एक मोठा अडथळा ठरू शकतो.

झपाट्याने बदलणाऱ्या जगात असे बदल कायम होत राहणार व त्यांचा वेगही मोठा असणार, हे वास्तव मान्य करायला हवे. मोबाइल फोनप्रमाणेच शिकण्याशिकवण्याची नवीन साधनेही येत राहणार व जीवनाचा अविभाज्य भाग होणार हे वास्तव आहे. या सर्व गोष्टी शाळा, शिक्षक, विद्यार्थी व पालक ह्यांवर यापुढे कोसळणार आहेत. त्यामुळे अशा नवनवीन साधनांशी जुळवून क व त्यांचा वापर गुणवत्ताविकासासाठी कसा करून घ्यायचा, हेही शिक्षणप्रेमींपुढे एक आह्वान ठरणार आहे.

1 ला माळा, मेघदूत, सामंतवाडी. गोरेगाव (इ), मुंबई 400063.

■■

सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण साध्य करायचे तर सर्वंकष मूल्यमापन अत्यावश्यक!

विवेक मॉंटेरो

'सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण' हे काही मूठभर लोकांचे काम नाही. त्यासाठी लाखो हातांची गरज आहे. 'प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण' हे उद्दिष्ट आपल्याला गाठायचे असेल तर त्यासाठी एक पद्धतशीर सातत्यपूर्ण आणि समग्र कार्यक्रम आखावा आणि प्रत्यक्षात आणावा लागणार आहे. त्याचा एक आवश्यक भाग म्हणजे मूल्यमापन. हे मूल्यमापन कसे असावे, त्याचे आवश्यक घटक कोणते, त्याची प्रक्रिया कशी असावी याची चर्चा या टिपणात केलेली आहे. एक वर्ग-एक शाळा-काही शाळा किंवा एखाद्या तालुक्यातील/ जिल्ह्यातील सर्व शाळा, यात गुणवत्ता दाखविण्याचे काम यापूर्वीही अनेकांनी केलेले आहे. त्याची सूत्रे आपल्याला त्यांच्याकडे मिळतील. परंतु महाराष्ट्राच्या संदर्भात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे उद्दिष्ट म्हणजे सुमारे 94,000 शाळांमधील, साडेचार लाख शिक्षकांमार्फत, 1 कोटी साठ लाख

मुलांपर्यंत पोहोचणे. इतक्या व्यापक स्तरावर गुणवत्ता कार्यक्रम आखताना मूल्यमापनाचा विचारही वैयक्तिक पातळीवरील गुणवत्ता-कार्यक्रमापेक्षा वेगळ्या पद्धतीने करावा लागणार हे ओघाने आलेच.

1. मूल्यमापन आणि गुणवत्ता याबाबतची काही विधाने

- व्यापक स्तरावर गुणवत्ता आणण्यासाठी संपूर्ण यंत्रणा आणि सर्व व्यवस्था गुणवत्तापूर्ण असायला हवी.
- मूल्यमापन आणि गुणवत्ता यांचा अतूट संबंध आहे. गुणवत्ता किती आहे किंवा नाही हे तपासतच आपल्याला त्यात आवश्यक सुधारणा करीत जाता येईल.
- यंत्रणेच्या सर्व स्तरांवर काटेकोर आणि भरंवशाचे मूल्यमापन उपलब्ध असल्याशिवाय गुणवत्तापूर्ण व्यवस्था निर्माण होणार नाही.
- शिक्षणात गुणवत्तापूर्ण व्यवस्था उभारायची, तर बांधीलकी मानणारे असंख्य शिक्षक आणि अधिकारी यांच्या एकत्रित आणि सुसूत्र प्रयत्नांनीच ते शक्य आहे.
- सर्व स्तरांवरील सर्व व्यक्तींसाठी प्रेरणा आवश्यकच असते.
- काटेकोर मूल्यमापन ही सोपी वाट नाही. यात अपयशाचीही शक्यता असते त्यामुळे प्रेरणा कमी होण्याची शक्यताही असते – याची आठवण ठेवावी लागेल.

एक महत्त्वाचा प्रश्न यातून उभा राहतो. – प्रेरणा व काटेकोर मूल्यमापन या दोन्ही गुणवत्ता साधण्यासाठीच्या अत्यावश्यक गरजा आहेत. यापेक्षा मूल्यमापनाला न घाबरता आपली प्रेरणा अढळ ठेवायला आपल्याला शिकावे लागेल.

2. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची गरज काय?

शिक्षण हक्क अधिनियमाला अपेक्षित असलेली गुणवत्ता म्हणजे काय याची चर्चा संमेलनाच्या पहिल्या सत्रात झालेली आहेच.

शिक्षणात गुणवत्ता आणणे हे मूठभरांचे काम नाही. 'सतत सुधारणेचा' पद्धतशीर कार्यक्रम राबवूनच ती आणता येणार आहे. सतत सुधारणा करायची तर ती मोजता आली पाहिजे आणि तपासता आली पाहिजे. गुणवत्तेच्या कोणत्या टप्प्यापर्यंत आपण पोहोचलो आहोत ते आपल्याला समजले पाहिजे. आपण त्याच जागी आहोत की पुढे जात आहोत हेही आपल्याला समजले पाहिजे. पुढे कोठे जायचे तेही आपल्याला कळले पाहिजे. या प्रश्नांची उत्तरे आपल्याला मिळायला हवी असतील तर विश्वासार्ह नैदानिक मूल्यमापनाला पर्याय नाही. नैदानिक म्हणजे निदान करणारे. आपल्या रुग्णाची तब्येत सुधारत आहे किंवा नाही, आपण देत असलेले औषध त्याला लागू पडते आहे का नाही, याचे 'निदान' करण्यासाठी जश्या काही तपासण्या कराव्या लागतात तश्या गुणवत्तेच्या तपासण्या म्हणजे 'नैदानिक मूल्यमापन'. असे मूल्यमापन सातत्याने करत राहावे लागते. त्याचप्रमाणे 'सतत सुधारणा कार्यक्रम' या स्वरूपातल्या गुणवत्तेच्या मोहिमेसाठीही असे सातत्यपूर्ण मूल्यमापन लागणार आहे. तुकड्यातुकड्याच्या प्रयत्नांनी सार्वत्रिक गुणवत्ता येणार नाही. व्यवस्थेच्या सर्व अंगांचा विचार

करून आखलेला तो समग्र प्रयत्न असायला हवा. सर्वांगीण सुधारणा करण्यासाठी मूल्यमापनही तसेच सर्वंकष हवे.

3. भारतातील केंद्र आणि राज्य पातळीवरील मूल्यमापनांचा अपुरेपणा :

स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या शिक्षणव्यवस्थेत मूल्यमापन हे क्षेत्र अत्यंत दुर्लक्षित राहिलेले आहे हे नाकारता येणार नाही. एन.सी.इ.आर.टी. ने या बाबतीत काही प्रयत्न केले असले तरीही ते बहुतांशी बालकांच्या वैयक्तिक मूल्यमापनापुरते मर्यादित आहेत. या मूलभूत गरजेकडे राज्य पातळीवरील संस्थांनीही लक्ष दिलेले नाही. सर्वंकष मूल्यमापनासाठी आवश्यक असलेली वर्ग, शाळा, तालुका, जिल्हा, राज्य पातळीवरील तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, प्रशिक्षणे, शिक्षणाचे व्यवस्थापन यांच्या मूल्यमापनाची साधने व प्रक्रियाही आज आपल्याकडे उपलब्ध नाहीत.

असरचे मूल्यमापन हे केवळ त्याचेच एक निदर्शक आहे, ते सर्वंकष तर नाहीच शिवाय व्यवस्थेची गुणवत्ताही ते तपासत नाही.

मूल्यमापनाबाबतचे जगभरातले लिखाण धुंडाळलेत तर या बाबतीतले बरेचसे शैक्षणिक काम हे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक मूल्यमापनासाठी असल्याचे आपल्याला दिसेल. संपूर्ण वर्गाच्या मूल्यमापनाचे काही संदर्भ आपल्याला त्यात जरूर मिळतात; शिक्षण हक्क अधिनियमामुळे अनिवार्य झालेल्या गुणवत्तेच्या सार्वत्रिकीकरणाच्या व्यापक कार्यक्रमासाठी उपयोगी पडेल अशा सातत्यपूर्ण आणि सर्वंकष मूल्यमापनाबाबतचा मात्र एकही अहवाल आम्हाला शोधूनही मिळाला नाही. ही कमतरता लक्षात घेतली पाहिजे. शिक्षण हक्क अधिनियमासाठी आवश्यक अशा सर्वस्तरीय सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची साधने आणि पद्धती आपल्याला नव्यानेच निर्माव्या लागणार आहेत.

या संमेलनाचा एक मुख्य हेतू, सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्वस्तरीय सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची आखणी करणे व त्यातील काही साधने 2012-13 या शैक्षणिक वर्षात तयार करणे असे आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन हे केवळ बालकांसाठी नाही, तर व्यवस्थेच्या सर्व घटकांसाठी आवश्यक आहे. त्यात शिक्षक, अधिकारी, प्रशासक, धोरणकर्ते आणि मंत्र्यांचाही समावेश असायला हवा.

4. शिक्षण हक्क सुसंगतता आणि मूल्यमापन

शिक्षण हक्क अधिनियमामुळे आता गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रत्येक मुलामुलीपर्यन्त पोचण्याला पर्याय उरलेला नाही. त्या बाबतीत चालढकलही करण्याजोगी परिस्थिती उरलेली नाही. गुणवत्ता आणि शिक्षण हक्क सुसंगतता यांची मानके, निकष आणि मोजण्याजोगे निर्देशक ठरविणे अशाप्रकारे आपल्याला मूल्यमापनाचा विचार करावा लागणार आहे. किती गुणवत्ता संपादता आली याची जी व्याख्या आपण करू आणि त्याचे निर्देशक ठरवू ते मग आपल्याला तपासत जाऊ. शिक्षण हक्क सुसंगतता हेही एका फटक्यात होणारे काम नाही. व्यापक स्तरावर यश मिळवायचे आणि पायरीपायरीने आणखी पुढच्या टप्प्याला पोचायचे असे करीत जाण्याची

ही प्रक्रिया आहे. जसजशी आपण व्यापक स्तरावर गुणवत्ता मिळवू तसतसे मूल्यमापनही टप्प्याटप्प्याने बदलत जाणार. तूर्त आपल्याला शिक्षण हक्क सुसंगतता टप्पा - 1 ची मूल्यमापन-साधने तयार करायची आहेत.

5. व्यापक गुणवत्ता कार्यक्रम : डेमिंग आणि जुरान

व्यापक स्तरावर गुणवत्ता सुधारण्यासाठी एडवर्ड डेमिंग आणि जोसेफ जुरान या दोघांच्या कल्पनांवर आधारलेले टोटल क्वालिटी मॅनेजमेंट, क्वालिटी सर्कल्स, कायझेन इ. कार्यक्रम औद्योगिक क्षेत्रात वापरले गेलेले आहेत. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत जपानने जगभरात जे नाव कमावले आहे त्यात या दोघांच्या कल्पनांचा मोठा वाटा आहे. त्यात आपल्यालाही उपयोगी पडेल असे आणि शिकण्यासारखे बरेच काही सापडते.

औद्योगिक क्षेत्रातील गुणवत्ता कार्यक्रमाकडून शिक्षणक्षेत्राने शिकण्यासारख्या प्रमुख दोन गोष्टी आहेत, एक म्हणजे, व्यापक गुणवत्तेचा पाया म्हणून 'सातत्याने सुधारणा करत राहणे व दुसरी म्हणजे संख्याशास्त्राचा वापर करून काही साधार पद्धतीची आखणी करणे.

अर्थात उद्योगधंद्यांमधील गुणवत्ता आणि शिक्षणातील गुणवत्ता यांत काही मूलभूत आणि गाभाभूत फरक आहेतच. उत्पादनामधील छोटेमोठे फरक कमीकमी करत , शक्यतो नाहीसे करत उद्योगांमध्ये गुणवत्ता आणली जाते. शिक्षणामध्ये विविधता केवळ स्वीकारलीच जात नाही, तर ती जोपासली जाते. व्यक्तीव्यक्तींमधील वैविध्य, आवडीनिवडी आणि उपजत क्षमता असतात, आणि हे आपल्याला स्वीकारावेच लागते. शिक्षणात गुणवत्ता येण्यासाठी फरक कमी करून म्हणजे संधीची समानता आणून पुरेसे होणार नाही, तर त्यातल्या फरकाचाच सन्मान करून आणि त्यांच्या विविधतापूर्ण वैशिष्ट्यांच्या विकासाला वाव देऊन ते करावे लागेल.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे मूल्यमापन, त्यासाठी केल्या जाणाऱ्या परीक्षा आणि अपयश यांचा एकमेकांशी संबंध आहे. या सगळ्याचा पुढे यशाच्या प्रेरणेशीही गाढा संबंध आहे. आपल्या मूल्यमापन व्यवस्थेपायी विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी कोणीच नाउमेद होणार नाही, त्यांचा उत्साह कोळपणार नाही याची आपल्याला काळजी घ्यावी लागेल. इतकेच नव्हे तर, मानवी घटकांना प्रेरणादायी ठरेल अशी एक नवी मूल्यमापन व्यवस्थाही आपल्याला तयार करावी लागेल.

सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण उभारायचे असेल तर प्रेरणा व सक्षमीकरणाची एक एकात्मिक व्यवस्था लागेल. त्याच्याशी सुसंगत व सुसूत्र असलेली खात्रीलायक आणि अत्यंत काटेकोर मूल्यमापन-व्यवस्था निर्माण करणे हे आपल्यासमोरचे एक मोठेच आव्हान आहे.

6. मूल्यमापन आणि प्रेरणा यांची जोडणी आणि मेळ

सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मोहीम म्हणजे आपली सर्वांचीच शिकण्याची प्रक्रिया. स्वयंमूल्यमापन हा त्या प्रक्रियेचा पायाच आहे. असे म्हणण्याचे कारण शिकणे आणि तपासणे हे परस्परावलंबित असते. आपण काय शिकलो ते जोखायची शिकणाऱ्या माणसाची

इच्छा असते. त्यामुळे मूल्यमापन आणि प्रेरणा यांची जोडणी करताना वरपासून खालपर्यंत सर्वांसाठी गुणवत्ता मोहीम ही शिकण्याची प्रक्रिया म्हणून बांधावी लागेल. गुणवत्ता हवी असेल तर सतत सुधारणा आवश्यकच असतात. शिकण्याच्या प्रक्रियेचाच तो एक भाग म्हणावा लागेल. त्यासाठी आपण आपल्याला पारखत राहायला हवे. सर्व स्तरांवरील सर्व कामांसाठी अशी स्वत:ला पारखण्याची म्हणजेच स्वयंमूल्यमापनाची साधने तयार करता येतील.

7. सकारात्मक मूल्यमापन

शिकण्याच्या कोणत्याही प्रक्रियेत, मग ते विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमाधिष्ठित शिकणे असो, शिक्षक-अधिकाऱ्यांचे सक्षमीकरण असो किंवा शिक्षणाचे व्यवस्थापन असो, ते करणाऱ्या व्यक्तीच्या ज्ञान-समज-आकलन यांत वाढ होत असते. शिक्षणप्रक्रियेचीच ही फळे असतात. मूल्यमापनाने ह्या फलिताची मोजणी करावी, ते तपासावे. उत्तमोत्तम फलिते देणाऱ्या प्रक्रिया शोधाव्यात आणि त्या पारखाव्यात. हा सकारात्मक मूल्यमापनाचा महत्त्वाचा भाग आहे. यशोदायी प्रक्रियांचे सार्वत्रिकीकरण करणे हाही सतत चांगले, त्याहून अधिक चांगले करण्याचा मार्ग आहे. शिकण्याच्या प्रक्रियेत सगळेच विद्यार्थी असतात – मुले, शिक्षक, प्रशासक, सगळेच. हे विद्यार्थी काय शिकले आहेत, त्यांनी काय साध्य केले आहे, त्यांना काय समजले आहे, त्यांना काय येत आहे हे मोजणारे मूल्यमापन आपल्याला तयार करावे लागणार आहे. विद्यार्थ्यांना काय येत नाही तेच केवळ मोजणे हा मूल्यमापनाचा उद्देश नसावा.

8. संपूर्ण प्रक्रियेच्या परिणामाचे बाह्य मूल्यमापन : व्यवस्थेतली अपयश ओळखणे व हाताळणे

वरील सर्व मुद्द्यांमध्ये एक अटळ आणि कठोर भागही आहे; बाह्य मूल्यमापन. स्वयंमूल्यमापनाबरोबरच आपल्याला आपल्या कृतीचे बाह्य मूल्यमापनही करायला हवे. म्हणजे त्यात काही चुकले असेल तर ते समोर येईल. 'मुलांना नापास करायचे नाही', ही शिक्षण हक्क अधिनियमाची रास्त अपेक्षा आहे. खरे तर याचा अर्थ एकही मूल नापास होणार नाही असे आपल्याला म्हणावयाचे आहे. नापास न होण्याच्या अपेक्षित पातळीपर्यंत मूल पोचावे यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी आपल्याला या व्यवस्थेत सुधारणा करीत जावे लागेल. अविरत प्रयत्न करूनही ज्या अधिकाऱ्यांची सुधारण्याची इच्छा नाही त्यांना शिक्षणाच्या प्रक्रियेपासून दूर करून दुसरे काहीतरी काम द्यावे लागेल. प्रत्येक बालक शिकले पाहिजे ही ज्या अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे त्यांना मात्र आपण 'नापास करायचे नाही' हा नियम लागू करायचा नाही. त्यांच्या कामाचा दर्जा असमाधानकारक असेल तर ते स्पष्ट केलेच पाहीजे. एक मात्र खरे की, व्यवस्थेचे अपयश समोर आणणारे असे बाह्य मूल्यमापन आपण सुरुवातीला करणार नाही. आपण त्यांनाही शिकण्याची पुरेपूर संधी आधी देणारच आहोत. यावरून एक गोष्ट स्पष्ट झालीच असेल की मूल्यमापन हा कुठल्याच टप्प्यावर सोपा रस्ता नाही. त्यात काटेकुटे आहेत, अडचणी आहेत. त्यामुळेच कदाचित भारतीय शिक्षणव्यवस्थेने आजवर पद्धतशीर काटेकोर मूल्यमापनाची साधने तयार केलेली नसतील!

9. स्पर्धात्मक वैयक्तिक परीक्षा

प्रत्येक मूल शिकण्यासाठी आवश्यक असलेल्या, वर उल्लेखलेल्या मूल्यमापनाच्या विरुद्ध दिशेने जाणारे एक काम मात्र, भारतीय शिक्षणव्यवस्थेने, विशेषतः खासगी क्षेत्राने, करून ठेवलेले आहे. स्पर्धात्मक वैयक्तिक परीक्षेची अक्षरशः अनंत साधने त्यांनी तयार करून ठेवलेली आहेत. अशा परीक्षेत 'हुशार' आणि 'ढ' अशी वर्गवारी करून मिळते आणि मग यशापयशाची सर्व जबाबदारी विद्यार्थ्यावरच ढकलता येते. प्रत्येकाला शिकविण्याच्या जबाबदारीतून काढलेली ही पळवाट म्हणजे भांडवली बाजारू व्यवस्थेचे मध्यवर्ती तत्त्व आहे.

'सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण' हे शिक्षण हक्क अधिनियमाचे उद्दिष्ट आणि शैक्षणिक बाजारवाद व स्पर्धापरीक्षा यांच्यातील विसंगती हा इथून पुढच्या काळात विवादाचा मुद्दा होणार आहे. या युद्धातली एक लढाई मूल्यमापनावरही होणार आहे.

या शैक्षणिक बाजारवादात निवड आणि चाळणी हेच मूल्यमापनाचे एकमेव उद्दिष्ट असते, पण आपण ज्या शिक्षण हक्क अधिनियमाबद्दल बोलत आहोत, तो मात्र सर्वसमावेशक आणि समग्र आहे आणि त्यासाठी मुळापासून वेगळ्या दृष्टिकोणाची गरज आहे.

10. ऑगस्ट 2010 चा सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा जी.आर.

महाराष्ट्र शासनाने ऑगस्ट 2010 मध्ये सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा जी. आर. काढला. त्यात लेखी परीक्षेबरोबरच तोंडी आणि प्रात्यक्षिक परीक्षाही अनिवार्य आहेत. यासारख्या काही चांगल्या गोष्टी असल्या तरी त्यांत काही नकारात्मक बाबीही आहेत. उदा. शिक्षकांना अवघड आणि अशक्य वाटेल अशा तऱ्हेने दैनंदिन नोंदी ठेवण्याची अपेक्षाही त्यात असावी असे या जी. आर. वरून वाटते, सांगायची विशेष गोष्ट अशी की अपेक्षित परिणाम, मानके आणि निकष यांच्याबाबत मात्र तो आश्चर्यकारकरीत्या असमाधानकारक दिसतो.

शिक्षकांना न जमण्यासारख्या या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मग शिक्षक काय करतात हे पाहिले तर माझ्या म्हणण्यातला मुद्दा अधिक स्पष्ट होईल.

1. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या जी.आर. अनुसार दैनंदिन नोंदी कश्या ठेवायच्या याची 'गाईडे' आता बाजारात उपलब्ध झालेली आहेत व शिक्षक त्यावरून आपल्या नोंदी उतरवून काढत आहेत. प्रत्यक्ष मूल आणि त्याच्या नावापुढे केलेली नोंद ह्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. हे अगदी पुण्यासारख्या शिक्षणाच्या माहेरघरीही घडत आहे.

2. सहावीच्या एका विद्यार्थिनीने तिच्या गणिताच्या पाठ्यपुस्तकावर अनुक्रमणिकेत प्रत्येक पाठाच्या नावासमोर 'आ' किंवा 'सं' असे लिहिले होते. आ म्हणजे आकारिक, आणि सं म्हणजे संकलित. त्यातल्या 'आ' पाठांचा अभ्यास करण्याची गरज नाही असे तिचे म्हणणे होते, कारण काय, तर 'ते परीक्षेत विचारणार नाहीत असे शिक्षकांनी वर्गात सांगितले आहे'.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या या जी. आर. चे 2010-11 आणि 2011-12 मध्ये प्रत्यक्षात नेमके काय घडले याचे मूल्यमापन करण्याची गरज आहे. आणि त्यानुसार त्यात बदल करणे आवश्यक असल्यास ते केलेही पाहिजेत.

11. वर्गाचे मूल्यमापन आणि तालुका स्तरावरचे व्यापक मूल्यमापन

या क्षेत्रातील आमच्या अनुभवावरून असे दिसते की शाळा आणि तालुका पातळीवर मुलांचे रँडम सँपल पद्धतीचे बाह्य मूल्यमापन करणे शक्य आहे आणि ते गुणवत्ता-सुधारणेसाठी नैदानिक म्हणून उपयोगी ठरेल. दरवर्षी थोडी थोडी सुधारणा करीत संपूर्ण तालुक्याची गुणवत्ता याद्वारे सुधारता येईल. शासकीय, खासगी, ग्रामीण, शहरी अशा सर्व प्रकारच्या शाळांमध्ये हे मूल्यमापन घेतले गेलेले आहे. या संमेलनानंतर जी वेबसाईट तयार होईल त्यावर या मूल्यमापनासाठी वापरलेले प्रश्न, त्याची पद्धती, निकाल व निष्कर्ष टाकले केले जातील. तो कच्चा खर्डा, मानून प्रत्येक शिक्षणकर्मीनी त्याचे चिकित्सक मूल्यमापन करावे आणि त्यानुसार तो सुधारत न्यावा. वापरणे-मागोवा घेणे – त्यानुसार पुन्हा सुधारणा करणे – पुन्हा वापरणे – पुन्हा तपासून पाहणे अशा चक्रातून नेत आपण त्यातून सुयोग्य योजना तयार करू.

12. शिक्षण हक्क अधिनियमाशी सुसंगत असणारे मूल्यमापन

अधिनियमाच्या कलम 29 मध्ये म्हटल्याप्रमाणे प्रत्येक बालकाचा सर्वांगीण विकास आणि शारीरिक व बौद्धिक क्षमतांचा जास्तीतजास्त विकास हे उद्दिष्ट म्हणून निश्चित केले असेल तर मूल्यमापन कसे हवे हे त्यातूनच स्पष्ट होते. परंतु इतरांपेक्षा चांगले करणे आणि स्पर्धापरीक्षांमध्ये वर्चस्व गाजवणे हे उद्दिष्ट असेल तर मात्र निराळ्या प्रकारचे मूल्यमापन लागेल. आपल्याला शिक्षण हक्क अधिनियमाच्या दृष्टीने हे मूल्यमापन करायचे आहे.

शिक्षण हक्क अधिनियमाशी सुसंगत मूल्यमापन

- 'सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षण' साध्य करण्यासाठी मूल्यमापन हा शिकण्याचा भाग व्हायला हवा. शिकणे आनंददायी असले पाहिजे. त्यामुळे मूल्यमापनही आनंददायीच असले पाहिजे.
- शिकण्याच्या प्रक्रियेतले मूल्यमापन नेहमी शिकल्यानंतरच व्हायला हवे. त्यामुळे सक्षमीकरण अंमलबजावणी – स्वयंमूल्यमापन – सुधारित अंमलबजावणी हे शिकण्याचे चक्र या बाह्य मूल्यमापनाच्या आधी असायला हवे.

स्वयंमूल्यमापन हाही शिकण्याच्या चक्राचाच अविभाज्य भाग

- 'सतत शिकण्याच्या' आणि पर्यायाने 'सतत गुणवत्ता सुधारण्याच्या' प्रक्रियेतील नैदानिक साधन हे सर्व स्तरांवरील मूल्यमापनाचे मुख्य उद्दिष्ट असायला हवे.
- सूक्ष्म स्तरावर प्रत्येक विषयासाठी अशी स्वयंमूल्यमापन साधने तयार केली पाहिजेत. मुलांनी करावयाचे असे स्वयंमूल्यमापन हाही वर्गातील शिक्षणप्रक्रियेचा अविभाज्य भाग व्हायला हवा.

पाठ्यपुस्तके आणि शैक्षणिक साहित्य

विकसनाचा भाग म्हणून ही साधने (ज्यात स्वाध्यायपत्रिका सुद्धा असतील) तयार झाली पाहिजेत.

- त्याचप्रमाणे 'माझे विद्यार्थी काय शिकले' हे तपासण्यासाठी शिक्षकांना उपयोगी पडतील अशी स्वयंमूल्यमापन साधनेही प्रत्येक विषयासाठी तयार करावी लागतील. मुलांचे वैयक्तिक मूल्यमापन व संपूर्ण वर्गाचे मूल्यमापन अशा दोन्ही स्वरूपात ही साधने असतील.

- शिकण्याच्या प्रक्रियेत चुका करण्याला महत्त्वाचे स्थान आहे हेही समजून घेतले पाहिजे. त्यामुळे चूक-बरोबर एकेरी पर्याय देणाऱ्या उत्तरांचा अपुरेपणाही समजून घेतलेला असावा. काही तथाकथित चुका ही मुलांनी त्या विषयज्ञानात वा अर्थ लावण्यात केलेली सर्जनशील सुधारणा असतें. ते ओळखण्याचे प्रशिक्षण शिक्षकांना दिले पाहिजे, हे अजिबात सोपे नाही. शिक्षकांच्या शिकण्याचा, सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचा हा भाग आहे. हे आणखी वरच्या स्तराचे मूल्यमापन असल्याने पहिल्या टप्प्यावर ते कदाचित वापरता येणार नाही.
- आपल्याला यातून काय साधायचे आहे त्या उद्दिष्टांच्या संदर्भानेच आपले हे मूल्यमापन आपण रचले पाहिजे. त्यामुळे अभ्यासक्रम आणि पाठ्यक्रमातील उद्दिष्टे साधताना त्या सोबतीनेच मूल्यमापनाचीही रचना केली पाहिजे.
- ही रचना करण्यांच्या प्रक्रियेत संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग असला पाहिजे.
- शिक्षण हक्क अधिनियमाच्या गुणवत्तेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी बहुस्तरीय मूल्यमापनाची गरज आहे. सर्व प्रक्रियांचे आणि सर्व अपेक्षित निष्पत्तींचे मूल्यमापन झाले पाहिजे. सूक्ष्म मूल्यमापन, स्थूल मूल्यमापन आणि व्यवस्थेचही मूल्यमापन असे ते तीन स्तर आहेत. ऑगस्ट 2010 चा जी. आर. हा केवळ सूक्ष्म मूल्यमापनाविषयी बोलतो.
  NCERT च्या मूल्यमापनावरील साधनपुस्तकातही आपल्याला याच मर्यादा दिसतात.
- महाराष्ट्राला लागू असलेल्या शिक्षण हक्क अधिनियमानुसार (कलम 11,13, 22) सर्व पातळ्यांवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे मूल्यमापन व्हावयाला हवे. स्वयंमूल्यमापनाच्या अँडिप्टस् या साधनात शैक्षणिक गुणवत्तेच्या स्वयंमूल्यमापनाची भर घालून ते पुढे विकसित करण्याजोगी जागा दिसते. आज त्यात शैक्षणिक गुणवत्तेचा फारसा समावेश नसला तरी शिक्षक, शाळा व्यवस्थापन समित्या, सर्व स्तरांवरील प्रशासक व अधिकारी या सर्वांसाठी अशी अँडेप्टस् तयार करता येतील.
- सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची साधने केवळ विद्यार्थ्यांसाठी नाही तर सर्वच स्तरांवरील 'शिकणाऱ्यांसाठी' लागणार आहेत. सर्व संबंधित घटकांकडे शिकण्याच्या प्रक्रियेतले विद्यार्थी म्हणून पाहिले पाहिजे. त्या सर्वांना स्वयंमूल्यमापनाची साधने मिळाली पाहिजेत. आपण काय शिकायला हवे आहे आणि त्या शिकण्यातून आपल्याला काय साधायचे आहे हे त्यांना स्पष्टपणे समजले पाहिजे.

शिक्षण हक्काच्या सुसंगततेसाठी

आपण जे निकष स्वीकारू त्याच्याशी या अपेक्षित निष्पत्तींचा थेट संबंध असेल.

- प्रत्येक स्तरावरील सक्रिय व्यक्तींच्या गटाद्वारे समावेशक आणि पारदर्शक प्रक्रियेतून ही सर्व मूल्यमापन साधने तयार होतील. ती सर्वांना पाहण्यासाठी खुली असतील आणि लोकांचा चिकित्सक प्रतिसादही घेतला जाईल.
- या संमेलनानंतर – सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणकर्मींचा जो गट तयार होईल त्या गटाने बहुस्तरीय व्यवस्थेच्या मूल्यमापनाचे संच बनविण्याची प्रक्रिया सुरू करावी. निकष आणि मानके ठरविणे हा त्याचा एक भाग असेल. प्रत्येक वर्गासाठी प्रत्येक इयत्तेसाठी

मूल्यमापनाची साधने तयार करावी लागतील. शाळा, क्लस्टर, तालुका, जिल्हा आणि राज्य अशा सर्व पातळ्यांसाठी मूल्यमापन साधने आणि त्याचे संच असले पाहिजेत.

- सर्व साहित्य आणि प्रक्रियांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन : सर्व साहित्य आणि प्रक्रिया विकसनशील आहेत असे मानले पाहिजे. प्रत्यक्ष वापर आणि अंमलबजावणी याद्वारे सुधारणेच्या सातत्यपूर्ण सर्वंकष प्रक्रियेचा त्या भाग आहेत असे मानले पाहिजे.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रक्रियेच्या मर्मदृष्टीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे सर्व प्रक्रिया आणि साहित्याची सतत तपासणी.

अंमलबजावणी आणि वापर या चिकित्सक पद्धतीने ही तपासणी व्हायला हवी.

पाठ्यपुस्तके आणि इतर

शैक्षणिक साहित्याचे मूल्यमापन शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी करायचे. शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यात हे साहित्य किती कार्यक्षम ठरते या आधारे ते मूल्यमापन झाले पाहिजे. पाठ्यपुस्तकांच्या मूल्यमापनासाठीची 'समिती' पद्धत आता कालबाह्य झालेली आहे आणि ती आपण सोडून दिली पाहिजे.

- मूल्यमापनाची अंमलबजावणीसुद्धा एका निश्चित दृष्टीने आखलेल्या योजनेप्रमाणेच केली पाहिजे. यासाठी तयार असलेल्या शिक्षकांच्या वर्गापासून सुरुवात करता येईल.

रँडम सँपल पद्धतीचे स्वतंत्र बाह्य मूल्यमापन

आधी या शिक्षकांच्या वर्गात करायचे. त्यांच्या वर्गाच्या मूल्यमापनाचे चित्र या प्रत्येक शिक्षकासमोर स्पष्ट आणि सोप्या पद्धतीने ठेवायचे म्हणजे त्याच्या कामात काय उत्तम झालेले आहे, कशात सुधारणा हवी आहे ते समजेल आणि आपापल्या वर्गाची गुणवत्ता सुधारण्यासाठी हे मूल्यमापन उपयोगी पडेल.

- मुलांच्या वैयक्तिक नोंदी शिक्षकांनी ठेवणे अपेक्षित आहे
- एका वैचारिक दृष्टीने काम करणारे अनेक गट आपल्यात असणे आवश्यक आहे. एकमेकांच्या भागात शिक्षण हक्क सुसंगततेचे निकष आणि मानके गाठणे हे आपले उद्दिष्ट आहे.

हे मोजण्याजोगे, भरवशाचे आणि वैज्ञानिक पद्धतीने स्वतंत्रपणे तपासता येण्याजोगे असले पाहिजे.

गुणवत्तेचे काही निर्देशक ठरवून, दरवर्षी त्यात सुधारणा करत हे साधायचे आहे.

संदर्भ : वरील माहिती शिक्षण हक्क अधिनियमाच्या गुणवत्तेच्या उद्दिष्टाशी संबंधित कायदेशीर कागदपत्रांमधून व शुद्ध अधिनियमामधून घेतलेली आहे.

मुंबई श्रमिक संघ, संघर्ष, क्यूरी रोड, भांडुप, मुंबई 400 078.

■■

संकलित, नैदानिक मूल्यमापन मुलांबद्दल काय सांगू शकते?

मधुरा मणेर

मुलांचे मूल्यमापन हा नेहमीच एक वादाचा विषय राहिला आहे. मूल्यमापन कसे करायचे, कुणी करायचे, कधी करायचे यावर अनेक मत-मतांतरे आहेत. मुलांच्या भावनिक स्वास्थ्याशी जवळचा संबंध असल्यामुळे हा विषय विशेष महत्त्वाचा आहे. आणि भारतासारख्या देशात जेथे बहुतेक शाळांमध्ये मूल्यमापनासाठीच अध्यापन केले जाते तेथे तर यावर चर्चा होणे आवश्यकच आहे. जगभरातल्या अभ्यासानंतर हे दिसून आले आहे की शिक्षकांनी स्वतः केलेले सातत्यपूर्ण सर्वंकष आकारिक मूल्यमापनच मुलांना किती येते याबद्दल नेमका अंदाज देऊ शकते. आज शिक्षण हक्क अधिनियम आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा यांतही हाच आग्रह धरला आहे. संकलित मूल्यमापनाचा उपयोग आजपर्यंत पास-नापास ठरवण्यासाठीच होत आलेला आहे. मुलांची बलस्थाने जाणून घ्यायला, ती कुठे कमी पडत आहेत हे पाहायला, किंबहुना अध्यापनात सुधारणा व्हावी यासाठीही या प्रकारच्या मूल्यमापनाचा वापर होताना दिसत नाही. शिवाय वर्ष अखेरच्या परीक्षांमधील बहुतांश प्रश्नांचा भर केवळ स्मरणशक्तीवर असतो.

आजकाल आठवीपर्यंत नापास तर कुणी होत नाही. पण मुले पुढच्या वर्गात गेल्यानंतर आधीच्या वर्षीच्या कोणत्या संकल्पनांवर त्यांना अधिक काम करणे गरजेचे आहे यावर शिक्षकांकडून मुलांना नेमके काही कळत नाही. नवीन वर्गात कच्च्या पायावरच नवीन ज्ञान संपादन करण्याची अपेक्षा आपण मुलांकडून करत राहतो.

संकलित, नैदानिक मूल्यमापनाची वैशिष्ट्ये

एखाद्या वर्गाची एखाद्या विषयाची सरासरी समज काय आहे, कोणत्या संकल्पना बहुतेक मुलांना प्रामुख्याने अवघड वाटतात हे जाणून घेण्यासाठी संकलित व नैदानिक (diagnostic) मूल्यमापन खूप उपयोगी ठरते. एक तर हे मूल्यमापन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला केले पाहिजे. मुले दीडेक महिन्यांच्या सुट्टीनंतर शाळेत आलेली असतात. त्यांना मागच्या वर्षीचे खरोखर काय समजले आहे हे आपल्याला अश्या परीक्षेवरून कळू शकेल. दुसरे म्हणजे या परीक्षेत शक्यतो मागच्या वर्षीच्या सर्व संकल्पनांचा समावेश होईल असा प्रयत्न असावा. प्रश्नांची भाषा : सरळ सोपी व रचना मुलांच्या परिचयाची असावी. प्रश्न मुलांच्या जीवनाशी निगडित असावेत. लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक अशा तीनही रूपांमध्ये परीक्षा घेतली तर मुलांच्या वेगवेगळ्या कौशल्यांना योग्य न्याय मिळेल.

नवनिर्मिती या संस्थेबरोबर मूल्यमापनावर काम करताना मी अशा प्रकारची गणित विषयाची चाचणी तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी तयार केली होती. प्रत्यक्ष मूल्यमापन करताना वर्गातील कुठल्याही 5 मुलांची (random selection) निवड केली. महत्त्वाचे म्हणजे मुलांना जेथे-जेथे प्रश्न समजायला अडचण आली तेथे-तेथे त्यांना मदत केली कारण

मूल्यमापनाचे मुख्य ध्येय त्यांची गणिताची समज तपासणे हे होते, त्यांच्या वाचण्यालिहिण्याचे कौशल्य नव्हे. याच कारणामुळे एखाद्या मुलाने अंक शब्दात लिहा या प्रश्नात तेवीस ऐवजी तीवीस किंवा सत्त्याहत्तर ऐवजी सतेहतर असे लिहिले असले तरी आम्ही ते बरोबर दिले.

डाटा विश्लेषण

सर्व पेपर तपासून झाल्यावर मायक्रोसॉफ्ट एक्सेलमध्ये पुढीलप्रमाणे मांडणी केली.

	प्रश्न 1	प्रश्न 2	प्रश्न 3	प्रश्न 4	एकूण
विद्यार्थी अ	2	1	1	0	4
विद्यार्थी ब	2	0	2	0	4
विद्यार्थी क	2	1	2	0	5
एकूण	6	2	5	0	13
किती पैकी	6	6	6	6	24
%	100	33.3	83.3	0	54.16

या प्रकारच्या मांडणीमुळे आडव्या ओळीत शेवटी प्रत्येक विद्यार्थ्यांचे एकूण गुण मिळतात तर उभ्या स्तंभामध्ये प्रत्येक प्रश्न कितीजणांनी अचूक सोडवला आहे ते कळते. प्रत्येक प्रश्न हा एका विशिष्ट संकल्पनेवर आधारित असल्यामुळे एखादी संकल्पना वर्गातील अंदाजे किती टक्के मुलांना सोपी वाटते हे कळून येते. उदाहरणादाखल एका वर्गाचा गणिताच्या चार संकल्पनांबद्दलचा तक्ता खाली दिला आहे.

प्रश्न क्र.	संकल्पना	किती% मुलांना सोपे वाटते
1	हातच्याची बेरीज	100
2	अपूर्णांक	33.3
3	घनफळाची बेरीज	83.3
4	हातच्याची वजाबाकी	0

अशी माहिती मिळाल्यानंतर अधिक वर्गाची व अधिक शाळांची तुलनाही करता येते.



एकदा अशा प्रकारची माहिती नैदानिक चाचणीतून मिळाली की त्या वर्गासाठी किंवा

शिक्षकांसाठी काय करता येईल हे ठरवता येऊ शकते. अशा नैदानिक चाचण्या तयार करणे मात्र सोपे काम नाही. त्या बनवताना प्रश्नांच्या भाषेवरती बरेच काम करावे लागते. तसेच कोणत्या प्रकारच्या प्रश्नांमधून मुलांच्या समजेबद्दल जास्तीत जास्त माहिती मिळू शकेल याचाही खूप विचार करावा लागेल. अशा विश्वसनीय नैदानिक चाचण्या सर्व विषयांसाठी तयार झाल्या की त्या सर्वांना उपलब्ध होणे आवश्यक आहे. मग स्थानिक भाषा, जागा, मुलांच्या परिचयाच्या गोष्टी यांनुसार त्यात बदल करता येतील. अशा चाचण्या शिक्षकांना मुलांबद्दल आणि आपल्या शिकवण्याबद्दलही खूप काही सांगू शकतील.

प्रगत शिक्षण संस्था, फलटण

■■

माझे प्रगतिपुस्तक..... शोध शांतीचा

वैशाली गेडाम

माणसाने जीवन जगण्यास तयार होणे हा शिक्षणाचा मूळ हेतू. मग काय 'शिक्षण' ही संस्था निर्माण होण्याच्या आधी माणसे जीवन जगत नव्हती? निश्चितच जगत होती. खरे तर शिक्षण ही संस्था सुरू होण्यापूर्वीच अग्नी, चाक, शेती असे माणसाच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणारे क्रांतिकारक शोध लागले होते. माणसास अनेक कौशल्ये प्राप्त झाली होती. पण ती विभागलेली होती. नवीन पिढीलाही हे विखुरलेले ज्ञान एकत्रितपणे देणे तसेच समूहात जीवन जगताना लागणारी कौशल्ये, पाळावयाचे नियम, जबाबदाऱ्या, कर्तव्ये यांची जाणीव करून देणे व समाजाच्या कल्याणासाठी जागरूक व कर्तव्यतत्पर असलेली पिढी घडविणे हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून शिक्षण ही संस्था उदयाला आली.

अनेक आशावाद उराशी बाळगून आम्ही मुलांना शाळेत पाठवतो. प्रत्येक लहान मूल प्रचंड जिज्ञासा, कुतूहल, हळवेपणा आणि इवलेसे भय सोबत घेऊन शाळेत पहिले पाऊल टाकते. काही मुले चुणचुणीत, हजरजबाबी, तीव्र स्मरणशक्तीची असतात. त्यांना सुरुवातीपासूनच गुरुजींची वाहवा मिळत जाते. गुरुजी पुस्तक शिकवतात. आकलन, स्मरण चांगले असल्यामुळे त्यांना ही पुस्तके लवकर कळतात. तो लवकर पुस्तक शिकतो अन् हुशार होतो.

काही मुले अशी चुणचुणीत दिसत नाहीत. त्यांना पुस्तकांत आणि गुरुजींच्या शिकवण्यात फारसा रस नसतो. तरी ती जराशी अज्ञाधारक असतात. जसे सांगत आहेत तसे केले पाहिजे अशी त्यांची प्रामाणिक धारणा असते. त्यामुळे मनाला, बुद्धीला पटत नसेल तरी बिचारी हळू हळू अभ्यास करत राहतात. पास होण्यापुरते म्हणजे 35 ते 40 च्या दरम्यान गुण मिळवत राहतात.

काही मुले जराशी वेगळी असतात. त्यांचे मन दुसरीकडेच कुठेतरी अडकलेले असते.

निर्जीव शिकवणे आणि निर्जीव पुस्तके त्यांचे मन आकर्षित करू शकत नाहीत. ही मुले आपल्याच विश्वात हरवलेली असतात. शिकवलेले त्यांच्या लक्षात राहत नाही. समजत नाही. मग या मुलांवर सरळसरळ 'समस्याग्रस्त मुले' असा शिक्का मारला जातो.

तर अशी ही वेगवेगळ्या प्रकारची मुले शाळेत आपापल्या परीने शिक्षणव्यवस्थेशी लढा देत असतात. या वेगवेगळ्या प्रकारच्या मुलांचे मूल्यमापन एकाच पद्धतीने केले जाते. पूर्वी मुलांना गुणांनी जोखले जायचे तर आता श्रेणीने जोखले जाते. ज्या मुलांना 80-90 च्या वर गुण मिळायचे ती पेढे वाटायची. 60-70 वाली मुले समाधानी व्हायची. 40-50 वाली मुले हुश्श व्हायची. श्रेणी पद्धत आली तरी अ + वाल्यांनी पेढे वाटले. ब + वाल्यांना समाधान झाले. क + वाले म्हणाले ठीक आहे, चालतंय. ड वाले बिचारे फारच दीनवाणे झाले.

काय देते शाळा मुलांना? एक असा कागद ज्यावर—च्या वर गुण लिहिलेले असतील किंवा—श्रेणी ती वरची असेल तर त्यातून जगण्याची हमी मिळणार नाही तर आत्मविश्वास गडगडणार! असा तो कागद!! सुरुवातीला चैतन्यशील, कुतूहलांनी काठोकाठ भरलेली मुले वर्षाच्या शेवटी मिळणाऱ्या त्या कागदाप्रमाणेच निर्जीव बनतात. – वाली मुले संवेदनाहीन तर बाकी उदासीन, नकारात्मक, दैववादी.

आपण मुलांना शाळेत का घालतो? त्यांना काय येत नाही, तो कोठे कमी आहे हे सांगण्यासाठी की त्याला काय येते हे सांगण्यासाठी? पहिल्या वर्गात मुले दाखल होतात. त्यांना पूर्ण स्वातंत्र्य दिले तर त्यांच्या त्यांच्या क्षमतेप्रमाणे ती पुढे जात राहतात. काही मुले पहिल्या वर्गात लिहायला-वाचायला शिकतील तर काही तिसऱ्या वर्गात गती पकडतील. काय हरकत आहे? काय लिहिणे-वाचणे म्हणजेच जीवन आहे? एखाद्याला वेगाने लिहिता-वाचता आले म्हणून त्याला -+ शेरा द्यायचा आणि एखाद्याला नाही जमले लेखन-वाचन तर त्याला क, ड श्रेणीत नेऊन ठेवायचे? मला वाटते की या वयातल्या कुठल्याही मुलाला काही येत नसेल तर ती त्याच्या/तिच्या शिक्षकासाठीची एक सूचना आहे, त्याने ती ध्यानात ठेवावी आणि त्यानुसार आपल्या योजनेत आवश्यक असेल तर काही बदलही करावेत.

मी तर पहिल्या वर्गापासूनच तू कसा चांगला आहेस हेच त्याला सांगत गेले, काहीही झाले तरी तू A-1- च आहेस हे बिंबवत गेले, त्याच्या प्रगतिपुस्तकात त्याचे प्रतिबिंब उमटले तर त्याचा आत्मविश्वास केवढा वाढेल! आत्मविश्वास वाढला म्हणजे तो गती पकडेल. त्याला स्वतःविषयी गौरव वाटेल. त्याच्यात उपजत असलेल्या क्षमतांचा आपण आदर केला म्हणजे तो वेगाने प्रगती करेल. तिसऱ्या वर्गापर्यंत वेगाने लिहू वाचू शकेल. पुढे त्याला ज्या विषयाची आवड आहे त्या विषयातील ज्ञान तो मिळवेल. आवडीच्या क्षेत्रात पुढे जाईल. काय हरकत आहे? माझ्या पहिल्या वर्गातील मुलांना मी लेखन वाचनासाठी कधीच जबरदस्ती करीत नाही. काही मुले लिहिता-वाचता न येताच दुसऱ्या वर्गात जातात. यातल्या बहुतेकांना दुसऱ्या वर्गात माझी मदत फारशी लागतच नाही. ती न घेताच ते लिहायला-वाचायला लागतात. त्यांना आतूनच तशी प्रेरणा होते. कारण मी त्यांना तू कमी आहेस, मागे आहेस, तुला येत नाही असे कधीच म्हणत नाही. माझ्या दृष्टीने प्रत्येक मूल A-1 आहे आणि ते मी त्यांच्यापर्यंत

पोचविण्याचा प्रयत्न करते. ही प्रेरणाच त्याला पुढे अभ्यासाला प्रवृत्त करते. जीवनात पुढे-पुढे जायला प्रवृत्त करते.

आपल्या शिक्षणशास्त्रात वाचन, लेखन या मूलभूत, प्राथमिक क्षमता मानलेल्या आहेत. आणि ज्ञान, आकलन, उपयोजन या त्यानंतरच्या क्षमता मानलेल्या आहेत. इथेच आपण फार मोठी चूक करून बसलो. खरे तर शाळेत येण्याच्या पूर्वीच बालकांच्या ज्ञान, आकलन, उपयोजन, कार्यात्मक व्याकरण, भाषेचा व्यवहारात उपयोग, शब्दसंपत्ती या क्षमता आधीच विकसित झालेल्या असतात. वाचन, लेखन ही केवळ ज्ञान मिळवण्याच्या आणि ते ग्रहण करण्यासाठीची साधन-क्षमता आहेत. ज्ञान देण्या-घेण्याच्या या दोन माध्यमांनाच आपण शिक्षण म्हटले आणि परीक्षेपुरते मर्यादित केले आहे. आपण काय करतो? मुलगा शाळेत आला की त्याच्यापाशी कोणते ज्ञान आहे, या ज्ञानाचे उपयोजन तो कसे करतो, त्याची आकलन क्षमता कोणत्या विषयात अधिक प्रगल्भ आहे हे जाणून न घेता, ते व्यक्त करण्याची संधी त्याला न देता, या क्षमता प्रगत होताना होणाऱ्या आनंदाची अनुभूती त्याला घेऊ न देता आपण त्याच्यावर एकदम श्रवण, भाषण, वाचन, लेखन यांचा भडिमार करतो. मुलांची श्रवण क्षमता विकसित करताना आपण त्याचे बोलणे आदराने, आनंदाने ऐकून न घेता आम्ही जे बोलतो ते तो कितपत ऐकतो आणि प्रतिसाद देतो याचा विचार करतो. विद्यार्थ्यांची श्रवण क्षमता वाढवायची असेल तर प्रथम त्यांची आपल्याला निरर्थक वाटणारी बडबड प्रेमाने, आनंदाने, उद्गारांसह, चेहऱ्यावरील भावांसह ऐकून घ्यायला हवी.

सध्या शासनाने सर्व मुलांना आठवीपर्यंत पास करण्याचे धोरण ठेवले आहे. शासनाचे हे धोरण स्वागतार्हच आहे. पण आठवीपर्यंतच सर्वांना पास करण्यापेक्षा दहावीपर्यंत पास केले तर हे अधिक चांगले होणार नाही का? दहावीच्या पुढे मग ज्याला ज्या क्षेत्रात आवड असेल त्या क्षेत्राकडे तो वळेल. दहाव्या वर्गात मुलांना अडकवून आपण काय साध्य करणार आहोत? शिवाय पहिल्या वर्गापासून त्याला तो -A-1 आहे हे त्याच्या मनावर बिंबवत राहिल्याने तो दहाव्या वर्गापर्यंत चांगलाच तयार होईल. त्यामुळे तो आणि त्याचे पालक योग्य क्षेत्र त्याच्यासाठी निवडू शकतील. अर्थात यातली शिक्षकांची जबाबदारी अनुल्लेखून चालणार नाही.

माझ्या मते तर मुलांना बारावीतही अडकवू नये. बारावीतून बाहेर पडल्यानंतर वेगवेगळ्या क्षेत्रांत जाण्यासाठी प्रवेशपरीक्षा असाव्यात. सध्या तश्याही आपण प्रवेश-परीक्षा घेतच आहोत. त्यांचे स्वरूप आणखी विस्तारित करावे. त्यात शेतीला आणि श्रमप्रतिष्ठेलाही विचारात घ्यावे. ज्या त्या क्षेत्रात आवड असलेली मुले तिकडे वळतील. त्या क्षेत्राचा अभ्यास करतील. उद्या चांगले शिक्षण घेतलेला हा मुलगा प्रयोगशील शेती करेल. आनंदाने रस्त्यावर माती टाकेल. समाजासाठी काम करेल. त्याच्यामध्ये असलेल्या नीतिमूल्यांना विकसित करत आपल्या मन, बुद्धी, आणि हातांनी आपले जीवन आणि जग सुंदर करेल.

द्वारा तुलेश चालकुरे, बालवीर वार्ड क्र.56, काँग्रेसनगरजवळ,
सेवादल बोर्डिंग, बिंबा रोड, चंद्रपूर 442402

■■

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मार्गदर्शक आराखडा

प्रियदर्शिनी कर्वे

प्रास्ताविक

1 एप्रिल 2010 रोजी शिक्षण हक्क अधिनियम लागू झाला आणि 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क घटनेने बहाल केला. शिक्षण हक्क अधिनियमातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया म्हणून 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा' ला शासन मान्यता देण्यात आलेली आहे. या आराखड्याने शिकण्या-शिकवण्यासाठी ज्ञान रचनावादी पद्धत वापरण्याचे सुचवले आहे. या पद्धतीला धरून केवळ अभ्यासक्रम, पाठ्यसाहित्य व शिकवण्याची तंत्रे यातच नाही तर शिकण्या-शिकवण्याच्या संपूर्ण यंत्रणेतही बदल होणे आवश्यक आहे. आजपर्यंत विविध बदल करूनही सर्व म्हणजे 100% बालके शिकलेली नाहीत आणि ज्यांना शाळेत जाण्याची संधी मिळाली त्यांच्याही शैक्षणिक गुणवत्तेबाबत प्रश्नचिह्नच आहे. हे लक्षात घेता यंत्रणेतील प्रक्रिया, पद्धती, वातावरण, कार्यसंस्कृती या सगळ्यात आमूलाग्र बदल करावे लागतील.प्रत्येकापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचविण्याचे उत्तरदायित्व मानून शासनातील प्रत्येक घटकाने पद्धतशीर काम करायला हवे. शासनाने या पद्धतीने काम करावे यासाठी सक्रिय मदत तसेच गरज पडल्यास दबाव आणण्याचे काम समाजाने करायला हवे.

याचाच एक भाग म्हणून सर्व बालकांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचविण्याचा एक संभाव्य मार्गदर्शक आराखडा आम्ही येथे सुचवीत आहोत. गुणवत्तेत सतत सुधारणा करीत करीत परिपूर्णतेकडे जाण्याची संकल्पना गाभाभूत मानून या आराखड्याची रचना करण्यात आलेली आहे.

मार्गदर्शक आराखड्याची गरज

शिक्षणविषयक धोरणे, अभ्यासक्रम, पाठ्यसाहित्य, शिक्षकांची सेवापूर्व य सेवांतर्गत प्रशिक्षणे, लोकसहभाग, शिक्षणखात्याची कार्यपद्धती यांसारखे अनेक घटक शिक्षणाच्या गुणवत्तेवर थेट परिणाम करीत असतात. आजपर्यंतच्या कार्यपद्धतीतून बरीच मुले शिकली हे जरी खरे असले तरी बरीच, विशेषतः वंचित गटातील मुले शिक्षणापासून विन्मुख राहिली हेही तितकेच खरे आहे. आजच्या शिक्षणव्यवस्थेच्या प्रारूपातील सर्वात मोठा दोष म्हणजे अभ्यासक्रम, पाठ्यसाहित्य निर्मिती, शिक्षक प्रशिक्षण व सबलीकरण आणि शिक्षणखात्याचे काम या गोष्टींचा स्वतंत्रपणे केला जाणारा विचार. या चार महत्त्वाच्या घटकांचे सुसूत्रीकरण अत्यावश्यक आहे. या चार घटकांना एकत्र गुंफणारे प्रारूपच संपूर्ण शिक्षणव्यवस्थेची गुणवत्ता सुधारू शकेल असा आमचा विश्वास आहे.

आज हे सुसूत्रीकरण न झाल्यामुळे प्रत्येक घटक आपले आपले वेगळे काम करीत राहतो व त्यामुळे काम एकसंध न होता तुकड्या तुकड्यात व बरेचदा अर्थहीन होते. आणि

म्हणून शिक्षणव्यवस्थेचा सर्व अंगांनी विचार करून बनविलेल्या मार्गदर्शक आराखड्याची आज गरज निर्माण झाली आहे.

मार्गदर्शक आराखडा बनविताना गृहित धरलेल्या गोष्टी व वैशिष्ट्ये

सर्व शासकीय शाळांमधील सर्व शिक्षक आपापल्या वर्गात मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊ शकतात व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाल्यास सर्व मुले शिकू शकतात हे या आराखड्याचे प्रमुख गृहीतक आहे. काही धडपडणारे शिक्षक आपापल्या शाळेत यशस्वीरीत्या बदल घडवून आणू शकतात. त्यांच्याच प्रयोगांपासून सुरुवात करून संपूर्ण शिक्षणव्यवस्थेतच बदल घडवून आणणे शक्य आहे हा या आराखड्याचा पाया आहे. याशिवाय सद्यः परिस्थितीत शासनाकडे महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांपर्यंत पोचण्याची बऱ्यापैकी व्यवस्थापकीय यंत्रणा जरी असली तरी गुणवत्तेच्या विविध घटकांमधील आवश्यक त्या मार्गदर्शनासाठी यशस्वी प्रयोग करणाऱ्या अशासकीय व्यक्ती व संस्थांबरोबर शासनाला काम करावे लागेल ही आणखी एक गोष्ट आराखड्यात गृहीत धरलेली आहे. शासकीय व अशासकीय व्यवस्थांच्या एकत्रित कामामुळे हे काम अधिक वेगाने अधिक व्यापक पातळीवर पोहोचविता येईल.

मार्गदर्शक आराखड्याची कार्यवाही करण्यापूर्वी सर्व मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी किमान काय करायचे आहे याबद्दल सर्व सहभागी घटकांमध्ये बऱ्यापैकी एकवाक्यता असेल याची काळजी घेतली जाईल. तसेच सातत्याने गुणवत्तेत वाढ कशी होत जाईल याची चर्चा करण्यासाठी या आराखड्यात अवकाश असेल.

मार्गदर्शक आराखडा संकल्पना

शिक्षण हक्क अधिनियम ही एक चांगली सुरुवात असली तरी त्यात अजून सुधारणेला वाव आहे. असे असले तरीही अधिनियमाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे जे जे निकष दिले आहेत, ते समजून घेणे व किमान त्यांच्या पूर्ततेसाठी जाणीवपूर्वक व योजनाबद्ध प्रयत्न करण्यासाठीचा हा मार्गदर्शक आराखडा आहे. येथील गटाने दोन मार्गदर्शक आराखडे बनविले आहेत. पाहिला आराखडा शासनाच्या सहभागासह व दुसरा शासनाच्या सहभागाशिवायचा असेल. तसेच सुरुवात शासनाशिवाय झाली आणि शासनाची नंतर साथ मिळाली किंवा झाले तर तेही अंमलबजावणी होत असताना शिक्षण हक्क अधिनियमात काही आवश्यक बदल झाल्यास हे बदल सहजपणे कवेत घेता येतील अशी लवचिकता या आराखड्याच्या रचनेत आहे.

या आराखड्यांमध्ये शिक्षक प्रशिक्षण, साधन व्यक्ती आणि त्यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, साधननिर्मिती, व्यवस्थापन बदल आणि टप्प्याटप्प्याने वाढत जाणारी व्याप्ती यांचा समावेश आहे.

प्रस्तावित डेमो सीड प्रारूप

सर्वप्रथम आपण शासनाच्या सहभागाने हा मार्ग कसा चोखाळता येईल हे पाहू.

सध्याचे शिक्षक-प्रशिक्षणाचे प्रारूप सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या ध्येयासाठी फारसे उपयुक्त नाही, कारण त्यात असणाऱ्या उतरंडीमुळे प्रत्येक पायरीवर माहिती व ज्ञानाचा

ह्रास होऊन शेवटी शिक्षकापर्यंत फारच कमी ऐवज पोचतो. त्या व्यतिरिक्त प्रशिक्षणासाठी राज्य पातळीवर केंद्रीभूत संच व साहित्य तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये प्राथमिक शाळेच्या वर्गात शिकवणाऱ्या शिक्षकांच्या अनुभवांचा समावेश नसतो आणि प्रशिक्षणासाठी निवडलेल्या साधनव्यक्तीच्या निवडीमध्ये पारदर्शकता नसते.

या सर्व त्रुटी लक्षात घेऊन आम्ही पुढील डेमो-सीड प्रारूप मांडतो आहोत.



चित्र 1 : शिक्षक-प्रशिक्षणाचे प्रचलित प्रारूप



चित्र 2 : डेमो सीड प्रारूपाची सांकेतिक रचना

वरील चित्रातील प्रत्येक पातळीवर असणाऱ्या व्यक्ती व त्यांच्या जबाबदाऱ्या याचे विवेचन खाली दिले आहे.

राज्यपातळीवरील साधनगट

या गटात मुलांना शिकवण्याचा यशस्वी अनुभव असणारे व साधनगटात स्वेच्छेने सहभागी झालेले शिक्षक व अधिकारी असतील. यांच्यावर अभ्यासक्रम निर्मिती, एकात्मिक प्रशिक्षणांची आखणी व शाळा पातळीवरील व्यवस्थापकीय अंमलबजावणीची रचना तयार करणे या जबाबदाऱ्या असतील.

पथदर्शी शिक्षक व त्यांच्या शाळा

जानेवारी-फेब्रुवारी 2011 मध्ये SCERT ने एका सुनियोजित निवडप्रक्रियेने संपूर्ण राज्यभरातील प्रत्येक तालुक्यातून 16 अशा सुमारे 6500 शिक्षक-साधन व्यक्तींची निवड केले होती. एकेका विषयासाठी प्रत्येक तालुक्यात दोन याप्रमाणे सर्व प्रमुख विषयांसाठी राज्यभरातून सुमारे 816 व्यक्ती उपलब्ध होतात. हे शिक्षक राज्य साधनगटाने दिलेल्या प्रशिक्षणांचा थेट लाभ घेतील व एका वर्षासाठी फक्त आपापल्या वर्गात किंवा शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची जबाबदारी घेतील.

आपापल्या वर्गात काम करीत असताना हा गट संतत राज्य साधन व्यक्तीच्या प्रत्यक्ष किंवा दूरध्वनी वा संपर्कजालाद्वारे संपर्कात राहील आणि सतत गुणवत्ता सुधार करण्याच्या प्रयत्नात राहील. या प्रक्रियेत शाळा-शाळांमधून त्या त्या विषयाची शैक्षणिक साधने तयार होतील. त्या शाळेतील इतर शिक्षकही उत्साहाने या प्रक्रियेत भाग घेतील अशी अपेक्षा आहे. शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याच्या या कामाच्या अंमलबजावणीसाठी शिक्षण खात्याच्या संबंधित यंत्रणांना आपले व्यवस्थापन स्वरूपही काही प्रमाणात बदलावे लागेल. या बदलांमधून नवे व्यवस्थापकीय प्रारूप तयार होईल.

राज्यपातळीवरील विस्तारित साधनगट

वरील पथदर्शी शिक्षक एका शैक्षणिक वर्षानंतर राज्य साधनगटाच्या सदस्यत्वासाठी अनुभवसिद्ध होतील. त्यामुळे पुढच्या टप्प्यासाठी साधनगटात मूळचे राज्य साधनगटाचे सदस्य व पथदर्शी शिक्षक मिळून आठशेपेक्षा जास्त व्यक्ती असतील. त्यापुढील टप्प्यामध्ये याच पद्धतीने दरवर्षी साधनगटांत भर पडत जाणार आहे. यामुळे प्रत्येक टप्प्यात अधिकाधिक शिक्षक व शाळांपर्यंत या साधनगटाला पोहचण्याची संधी मिळेल.

पुढील पथदर्शी शिक्षक व त्यांच्या शाळा

पूर्वी उल्लेख केलेल्या SCERT च्या निवडप्रक्रियेत भाग घेतलेल्या परंतु पहिल्या फेरीत निवड न झालेल्या इतर शिक्षकांना दुसऱ्या टप्प्यात पथदर्शी शिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळेल. यात आधीच्या टप्प्यातील पाथदर्शी शाळांमधील इतर शिक्षक प्राधान्याने समाविष्ट केले जातील. पहिल्या टप्प्यातील पथदर्शी शिक्षक प्रत्येकी दहा नव्या शिक्षकांची जबाबदारी घेईल. आधीच्या टप्प्यात तयार झालेल्या शैक्षणिक साधनांची पडताळणी या नव्या शिक्षकांद्वारे दुसऱ्या टप्प्यात केली जाईल.

या प्रक्रियेतून या टप्प्याच्या अखेरपर्यंत नव्याने या गटात सामील झालेल्या सर्व शिक्षकांची शैक्षणिक गुणवत्तेच्या निकषांशी चांगली ओळख होईल.आवश्यक शैक्षणिक गुणवत्तेसाठी लागणाऱ्या शासकीय यंत्रणेतील बदलांवरही शिक्का मोर्तब होईल. या पद्धतीने प्रत्येक टप्प्यात शिक्षकांच्या संख्येत 10 पटीने वाढ होईल व तीन वर्षात संपूर्ण महाराष्ट्रात सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळू लागेल.

दरवर्षी शैक्षणिक साधनांचे मूल्यमापन होईल व सातत्यपूर्ण सुधारणा होत राहतील.

नैदानिक चाचण्या वापरून प्रत्येक वर्गात प्रत्येक विषयात सातत्यपूर्ण सुधारणा होत राहील. यातून वर्ग, शाळा, क्लस्टर, तालुका, जिल्हा पातळ्यांवरील विद्यार्थ्यांच्या सरासरी संपादनात वाढ होत जाईल. त्यावेळी महाराष्ट्राचे चित्र कसे दिसेल?

तर स्वानुभवातून सातत्यपूर्ण सुधारणांची कार्यसंस्कृती सर्व शिक्षकांच्या दैनिक व्यवहाराचा भाग बनलेली असेल.

मुलांचा शिकण्याचा अनुभव गुणवत्तापूर्ण बनण्यासाठी आवश्यक साधनसामुग्री व व्यवस्थापकीय यंत्रणा उपलब्ध झालेली असेल.

गुणवत्ता पूरक पद्धती शाळेत व संपूर्ण शासकीय यंत्रणेत रुजलेल्या असतील.

राज्यपातळीवरील पूर्ण विस्तारित साधनगट

राज्यातील सर्व शाळा गुणवत्ता निकषांच्या पूर्ततेपर्यंत पोहचतील, तेव्हा या प्रक्रियेतून गेलेले सर्व शिक्षक व बरेचसे अधिकारी साधनगटाच्या सदस्यत्वासाठी अनुभवसिद्ध असतील. या पूर्ण विस्तारित साधनगटात बहुसंख्येने शिक्षक व काही अधिकारी असतील. जवळ जवळ प्रत्येक शाळेत कोणत्या न कोणत्या विषयातील साधनव्यक्ती प्रत्यक्ष सेवेतील शिक्षक म्हणून उपलब्ध असतील व नवीन येणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या अनुभवाचा फायदा मिळेल. या प्रारूपामध्ये राज्य साधनगट ही एक तात्कालिक यंत्रणा नसून कायमस्वरूपी कार्यरत राहणरी व गुणवत्तेच्या अधिकधिक वरच्या पातळ्यांपर्यंत सर्व यंत्रणा जाव्यात यासाठी सतत प्रयत्न करणारी असेल.

दरवर्षीच्या अनुभवातून शैक्षणिक साहित्यात सातत्यपूर्ण सुधारणा होत जातील. गुणवत्तेच्या अधिकाधिक परिपूर्ण निकषांच्या पूर्ततेकडे जाण्याचे चक्र सतत चालू ठेवता येईल. गुणवत्तेच्या निकषापर्यंत पोचण्याच्या सर्व प्रक्रिया पारदर्शी पद्धतीने केल्या जातील, कोणालाही पाहण्यासाठी खुल्या असतील.

या साऱ्या प्रक्रियेतून माहितीच्या देवाणघेवाणीच्या आधुनिक पद्धतीचा वापर करणारे स्थानिक तसेच राज्यस्तरीय गट तयार होतील. संपूर्ण सज्याचे शैक्षणिक धोरण ठरवण्यात स्थानिक पातळीवरील गटांचे महत्त्वाचे योगदान असेल.

दोन प्रारूपांची तुलना (तक्ता 3)

प्रचलित प्रारूप	डेमो सीड प्रारूप
■ निर्णयप्रक्रियेत व प्रशिक्षणाच्या रचनेत स्थानिक शिक्षक व अधिकारी यांचा सहभाग नाही.	■ निर्णयप्रक्रियेत व प्रशिक्षणाच्या रचनेत स्थानिक शिक्षक व अधिकारी यांचा जास्त सहभाग.
■ मुलांशी-शिक्षकांशी सतत संबंध येणारे लोक प्रशिक्षकांमध्ये नाहीत.	■ प्रशिक्षकांचा मुले-शिक्षक यांच्याशी सतत संबंध आहे.
■ एकदाच प्रशिक्षण	■ सातत्यपूर्ण सबलीकरण

■ प्रशिक्षणाचे वर्तनवादी प्रारूप	■ प्रशिक्षणाचे ज्ञानरचनावादी प्रारूप
■ पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याची वर्गातील अनुभवाद्वारे पडताळणीची यंत्रणा नाही.	■ सर्व शैक्षणिक साहित्याचे प्रत्यक्ष वापरातून मूल्यमापन व सातत्यपूर्ण सुधारणा होतात.
■ सर्व शिक्षकांपर्यंत दरवर्षी एकदा पोहोचता येते.	■ पहिल्या वर्षी फक्त पथदर्शी शिक्षकांपर्यंत, पण टप्प्याटप्प्याने सर्व शिक्षकांपर्यंत सर्वकाळासाठी पोहोचणार.
■ चर्चा, सहभागाला वाव नाही. त्यामुळे शिक्षकांचा अनुभव व स्थानिक समज वापरली जात नाही.	■ चर्चा, सहभागाला वाव नाही. त्यामुळे शिक्षकांचा अनुभव व स्थानिक समज वापरली जात नाही.
■ वेगवेगळ्या शैक्षणिक घटकांच्या एकात्मीकरणाला वाव नाही.	■ वेगवेगळ्या शैक्षणिक घटकांच्या एकात्मीकरणाला वाव नाही.
■ शाळेत व व्यवस्थेत बदल आपोआप होतील असे गृहीत धरले आहे.	■ शाळेत व व्यवस्थेत बदल आपोआप होतील असे गृहीत धरले आहे.

शासनाच्या सहभागाशिवायचा आराखडा

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे पहिल्या आराखड्याची रचना शासनाचा सहभाग गृहीत धरून केलली असली तरी पर्यायी व्यवस्थेची आखणीदेखील महत्त्वाची आहे. त्यासाठी आपले डेमो सीड प्रारूप कसे असेल ते थोडक्यात पाहू.

- जे शिक्षक व शाळा स्वेच्छेने पुढे येतील, त्यांना पथदर्शी शिक्षक व पथदर्शी शाळा बनवण्यासाठी पुढील शैक्षणिक वर्षात उपक्रम राबवता येतील.
- पहिल्या वर्षानंतर प्रत्येक जिल्ह्यात एखादीतरी पथदर्शी शाळा तयार व्हावी यासाठी प्रयेत्न केले जातील.
- यासाठी राज्य साधनगटात स्वेच्छेने वेळ देऊ इच्छिणाऱ्या, मुलांच्या शिकण्याचा यशस्वी अनुभव असणाऱ्या तज्ज्ञांचा सहभाग असेल.
- तालुक्यातील शासकीय यंत्रणेला सहकार्याचे आवाहन केले जाईल.
- कार्यक्रम राबवण्यासाठी आर्थिक निधीची तरतूद करणे आवश्यक आहे.

शासनाशिवाय कार्यक्रम करताना

- पहिल्या वर्षी प्रत्येक जिल्ह्यात किमान पाच विषयवार पथदर्शी शिक्षक असतील.तसेच प्रत्येक जिल्ह्यात किमान एक पथदर्शी शाळाही असेल.
- दुसऱ्या वर्षी विषयवार, प्रत्येक जिल्ह्यात पथदर्शी शिक्षकांची संख्या किमान पन्नासापर्यंत जायला हवी. तसेच पथदर्शी शाळा प्रत्येक जिल्ह्यात किमान दहा असायला हव्या.

अशाप्रकारे आपल्याला आपल्या कार्यक्रमातून किमान काय साधायलाच हवे हे

तर ठरवायला लागेलच, त्याच बरोबर आपले आर्थिक अंदाजपत्रक व निधी उभा करण्याचे मार्ग यांवरही विचार विनिमय करावा लागणार आहे.

समारोप

हे दोन्ही मार्गदर्शक आराखडे अजून कच्चे आहेत. या कामात सहभागी होणाऱ्या शिक्षकांच्या व अधिकाऱ्यांच्या सहभागाने त्यात आणखी सुधारणा होतील. शिक्षकांच्या विविध गटांशी सल्लामसलत करून आपल्याला आपला रस्ता ठरवावा लागेल. बदलासाठी तयारी ठेवावी लागेल. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक असेल. सूचनांचे स्वागत असेल. कामाचा एक आराखडा करणे, काम सुरू करणे, इतरांच्या सूचनांनुसार व प्रत्यक्ष अंमल-बजावणीच्या अनुभवानुसार त्यात सतत सुधारणा करीत गुणवत्तेचे उद्दिष्ट गाठले जाईल.

द्वारा समुचित एनव्हिरोटेक प्रा. लिमि., फ्लॅट क्र.6, एकता पार्क को-ऑप.हौसिंग सोसायटी, निर्मिती शोरूमच्या मागे, अभिनव शाळेजवळ, लॉ कॉलेज रोड, पुणे 411 004.

■■

समारोप

मंजिरी निमकर

सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण संमेलन मुळातच एका अस्वस्थतेतून जन्माला आले. कोठारी आयोग आला-गेला. यशपाल समिती आली-गेली. सर्वशिक्षा अभियान आले-गेले. तसेच आता सर्वांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अभियानाचे होणार का? असा प्रश्न महाराष्ट्रातील शिक्षकांच्या मनात आल्याशिवाय राहिला नाही. महाराष्ट्राची परिस्थितीच तशी होती. शिक्षण हक्क अधिनियम राष्ट्रीय पातळीवर पारित केला गेला 2010 च्या एप्रिलमध्ये. त्यानंतर दीड वर्षांनी म्हणजे 2011 च्या सप्टेंबरमध्ये महाराष्ट्राने आपले नियम पारित केले. शिक्षकांना धारेवर धरण्यापलीकडे या अधिनियमामुळे नवीन काही झाले नाही. अशी प्रतिक्रियां सर्व शिक्षकांच्यात उमटलेली दिसत होती. विशेषतः गुणवत्तेच्या दृष्टीने फारशी काहीच हालचाल होताना दिसत नव्हती. गुणवत्ता म्हणजे नक्की काय? येथूनच प्रश्नांना सुरुवात होती. शिक्षकांना हे पुरे माहीत होते की शिक्षणात गुणवत्ता आल्याशिवाय शाळाबाह्य मुले शाळेत टिकवून ठेवणे अवघड आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिक्षक गटागटांत एकत्र येऊन चर्चा करू लागले. वर्तमानपत्रे-मासिकांमधील लेख वाचून त्या त्या व्यक्तींशी संपर्क साधू लागले. जे शिक्षक 2010 मध्ये तयार झालेल्या राज्यसाधनगटात सहभागी होते, ते त्या त्या गटातील साधनव्यक्तींना फोन करू लागले. अशा रीतीने या अधिनियमाचा शिक्षकांच्या पातळीवर तरी गंभीर विचार होऊ लागला.

शिक्षण हक्काच्या अधिनियमात अनेक त्रुटी आहेत. परंतु निदान स्वातंत्र्यानंतर 63 वर्षांनी हक्क तरी मिळाला आहे. तेव्हा त्यातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाचाच अर्थ जाणून घेऊ; असे ठरवून 2010 च्या राज्यसाधनगटातील एका गटाने पुढाकार घेतला व 14-15

जानेवारीला सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण संमेलन पुण्यामुंबईत न घेता वर्ध्यात घेण्याचे ठरले.

साधारणतः 100 शिक्षकांना निमंत्रणे गेली. 2010 मध्ये SCERT ने केलेल्या शिक्षक निवड प्रक्रियेच्यावेळी भेटलेल्या अनेक उत्साही व कार्यक्षम शिक्षकांचा त्यात अंतर्भाव होता. त्याहूनही अधिक शिक्षक विचारणा करीत होते. परंतु गट फार मोठा झाला तर संयोजकांना त्रास होईल व शिवाय चर्चा चांगली होणार नाही म्हणून 100-125 हा आकडा ठरवला. मात्र ऐनवेळी कोणाला निवडणुकीची प्रशिक्षणे लागली तर अधिकारी पदासाठीची कोणाची परीक्षा नेमकी 15 जानेवारीला घोषित झाली. त्यामुळे अनेकांना यायचे असूनही येता आले नाही. तरीही 70 शिक्षक पार नाशिक-नंदुरबारहून स्वखर्चाने, रजा टाकून, रात्रभर प्रवास करून, कडाक्याच्या थंडीत एस.टी.स्टँडच्या थंड कडप्प्यांवर चार चार तास बसची प्रतीक्षा करीत. बसमध्ये तास-न्-तास उभे राहून संमेलनाला आले होते.तेव्हाच लक्षात आले की अशा प्रकारच्या संघटनेची आणि गुणवत्ता विकसनाच्या कामाची आज खरोखरच फार गरज आहे.

14 तारखेला संमेलन सुमारे तासभर उशिरा सुरू झाल्याने गटकार्याला पुरेसा वेळ मिळाला नाही. सर्वांनी आपापली मांडणी मात्र अत्यंत प्रभावीपणे व तळमळीने केली. प्रश्नोत्तरांचे सेशन्सही चांगलेच रंगले. याशिवाय इतर वेळी अनौपचारिक गप्पांमध्येही आपापले अनुभव, नवीन प्रयोग, शंका, समस्या यांची भरपूर देवाणघेवाण झाली. अनेक शिक्षक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात एकेकटे काम करीत आहेत. आपापल्या परीने कुठेतरी पाहून, कुठेतरी वाचून, ऐकून मुलांना जास्तीतजास्त देण्याचा प्रयत्न करीत आहे. काही गट मिळून प्रयोगशील शाळांना भेटी देतात. शिक्षणात जन्मभर काम केलेल्या लोकांबरोबर चर्चा करण्यात दिवसभर घालवतात व पुन्हा नव्या ऊर्जेने कामाला लागतात. अनेक ठिकाणी अधिकारी पदावरील व्यक्ती त्यांना मदत करतात. प्रोत्साहन देतात. या साऱ्यांना एका सामाईक व्यासपीठावर एकत्र आणायला हवे आहे. गुणवत्ता म्हणजे निव्वळ उपक्रम किंवा कृतिशीलता नसून काहीतरी अधिक खोलातील आहे हे सर्वांना समजण्याची गरज आहे. सर्वांची वैचारिक बैठक पक्की करायला हवी. मुख्य म्हणजे माणसांच्या मनातील मरगळ, असहायतेची भावना दूर करायला हवी.

या औपचारिक-अनौपचारिक गप्पांमधून शिकायला मिळालेल्या गोष्टी म्हणजे शिक्षकांना आज कशाची गरज आहे याविषयीची स्पष्टता. यात भाषा अथवा गणित शिकविण्याच्या ज्ञान-रचनावादी पद्धतींबरोबरच पुन्हा-पुन्हा तीच-तीच माहिती वेगवेगळ्या प्रकारे भरून देण्याच्या कंटाळवाण्या कामातून मुक्त करणाऱ्या तंत्रज्ञानाचे व संगणक हाताळण्याचे कौशल्य, एकाच वेळी वेगवेगळ्या वयाची, वेगवेगळ्या क्षमतेची मुले असलेले पहिली ते चौथीचे वर्ग (एम.जी.एम.एल.) शिकविण्याचे कौशल्य आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सौहार्दभावना. मी एकटा/एकटी नाही. माझ्याशी दुरून का होईना संवाद साधणारे, गरज पडल्यास हाकेला येणारे अनेक आहेत हा विश्वास. तसेच माझ्याकडेही इतरांना देण्यासारखे खूप काही आहे ही भावना, फार महत्त्वाची आहे.

प्रगत शिक्षण संस्था, फलटण

■■

पत्रसंवाद :

श्री. दाभोलकरांच्या पत्रांच्या निमित्ताने

श्री दत्तप्रसाद दाभोलकर ह्यांची तीन पत्रे गेल्या दोन अंकांत प्रसिद्ध झाली आहेत. त्याचप्रमाणे गेल्या अंकाबरोबर आपल्या मासिकाची बावीस वर्षे पूर्ण झाली आहेत.

1990 मध्ये *नवा सुधारक* सुरू झाला तेव्हापासूनच ह्या मासिकात जाहिराती कधीही घ्यायच्या नाहीत आणि हे मासिक एका 'रिसर्च जर्नल'सारखे चालवावयाचे असे संपादकांच्या मनात होते. इतकेच नव्हे तर विवेकवादाविषयी ज्यांना जिज्ञासा असेल त्यांच्यात बंधुभाव निर्माण होईल आणि त्या मंडळींकडूनच हे मासिक पुढे चालवले जाईल असेही संपादकांना वाटत होते. पहिली दोन वर्षे आजीव वर्गणी स्वीकारण्यात आली नाही. फेब्रुवारी 1992 च्या अंकामध्ये आजीव वर्गणीदारांची योजना पहिल्याने प्रकाशित झाली. त्यावेळी संपादकांनी "*आजचा सुधारक* दोन वर्षे जगला आहे. त्याला लोकाश्रयही बऱ्यापैकी मिळाला आहे. त्यामुळे तो पुढेही चालू राहील अशी उमेद आम्हाला वाटत आहे म्हणून आजीव वर्गणीदाराची पद्धत सुरू करण्याचे आम्ही ठरवले आहे. रु.400 वर्गणी किंवा रु.1000 तीन वर्षांकरिता ठेव म्हणून दिल्यास आजीव वर्गणीदार होता येईल. तीन वर्षांनंतर ठेव परत केली जाईल." अशी योजना मांडली होती.

मासिकाच्या पहिल्या वर्षापासून वर्षभरात प्रकाशित झालेल्या लेखांची सूची दिली जात असे आणि जे आजीव वर्गणीदार होत त्यांची नावे आणि पूर्ण पत्ते मासिकात प्रकाशित करीत असू. हे पत्ते प्रकाशित करण्याचा हेतू आजीव वर्गणीदारांनी एकमेकांशी संपर्क ठेवावा आणि एक विवेकवादी लोकांचे मंडळ त्यातून निर्माण व्हावे असा होता. ह्या मासिकाचे स्वरूप पहिल्यापासून गंभीर आणि वैचारिक असल्यामुळे ते स्टॉलवर विकले जाणार नाही ह्याची संपादक-प्रकाशकांना माहिती होती. इतकेच नव्हे तर ह्या मासिकांचे वाचक आणि लेखक एकच असणार; पुढे मागे जे संपादक होतील ते वर्गणीदारांतून होणार; अशीच कल्पना आम्ही केली होती. ह्याचे स्वरूप विवेकवाद्यांच्या 'हाऊस जर्नल'सारखे असावे, ज्यांना हे मासिक पुढे चालावे असे वाटत असेल तेच आजीव वर्गणीदार होतील असेही आम्हाला वाटत होते.

सुरुवातीला आजीव वर्गणी 400 रु. होती. ती दहा वर्षांची एकत्र वर्गणी होती. पुढे आजीव वर्गणी वाढवावी लागली तर हे एका विचाराचे लोक मासिक पुढे चालू राहावे ह्यासाठी खुषीने वर्गणी देतील असे आम्हाला तेव्हा वाटले. ज्यांना हे मासिक पुढे चालत राहावे असे वाटत नसेल त्यांनी वाढीव वर्गणी देण्याचे कारण नाही. ज्यांना मासिक पुढे वाचण्यात स्वारस्य नाही ते वाढीव वर्गणी देणार नाहीत आणि म्हणून त्यांचा अंक बंद केला तरी त्यांचा आक्षेप राहणार नाही असे आम्हाला वाटले.

गेल्या वीस वर्षांमध्ये चलनवाढ अपेक्षेपेक्षा जास्त झाली. त्यामुळे जुन्या आजीव वर्गणीदारांना त्यांनी दिलेल्या वर्गणीच्या व्याजात मासिक पाठवणे अशक्य झाले. मध्यंतरीच्या काळात आजीव वर्गणीदारांना वाढीव वर्गणी पाठविण्याची विनंती आम्ही वेळोवेळी केली. तिला अनुसरून काहींनी वाढीव वर्गणी पाठवली परंतु सगळ्यांनी ती पाठवली नाही.

जुन्या आजीव वर्गणीदारांचा अंक बंद करावा असा प्रस्ताव जेव्हा विश्वस्तांच्या सभेपुढे आला तेव्हा जे आपली असमर्थता व्यक्त करतील त्यांना अंक पुढे चालू ठेवावा मात्र त्यांची नावे प्रकाशित करू नयेत असेही ठरवण्यात आले.

दाभोलकरांनी सगळ्या मासिकांना एकसारखे लेखले हे आम्हाला आवडले नाही. त्यांनी आजीव वर्गणीदारांचे पैसे आम्ही बुडवायला निघालो असा आमच्यावर आरोप केला. तो आम्हाला अर्थातच मान्य झाला नाही. दाभोलकरांचे एकट्याचे उदाहरण पाहिले तर त्यांच्या लक्षात यायला हरकत नाही की त्यांच्या 500 रु. च्या वर्गणीत त्यांना गेली अंदाजे 15 वर्षे अंक पाठवला जात आहे. 15 वर्षांच्या वार्षिक वर्गणीचा हिशोब केल्यास त्यांनी भरलेल्या वर्गणीच्या व्याजापेक्षा आम्ही अगोदरच जास्त अंक पाठवले आहेत असे लक्षात येईल. त्यांनी दरवर्षी वार्षिक वर्गणी भरली असती तर (आज मार्च 2012 पर्यंत रु. **1560 इतकी** रक्कम वार्षिक वर्गणीपोटी गेल्या पंधरा वर्षांत त्यांना भरावी लागली असती. त्यांनी भरलेल्या वर्गणीच्या व्याजाची रक्कम त्याहून कमी भरते. असो.

दाभोलकरांनी पाठविलेली वर्गणी आमच्याकडे त्यांनी ठेव म्हणून दिली असे ते समजत असावेत म्हणून आम्ही ती ठेव त्यांच्याकडे परत पाठवली. त्यांनी आमची मनिऑर्डर स्वीकारली नाही आणि ती आमच्याकडे परत आली. आम्ही आमचे कर्तव्य केले आहे. आता यापुढे त्यांना आजचा सुधारकचे वर्गणीदार आम्ही मानत नाही. त्यांना पुढेही आमचे अंक वाचण्यात स्वारस्य असेल तर त्यांनी नवीन वर्गणी पाठवावी अशी त्यांना विनंती आहे.

– दिवाकर मोहनी, माजी प्रकाशक आणि विश्वस्त

नंदा खरे, *193, शिवाजीनगर, नागपूर 440 010.*

मी : आर्थिक

नागपुरातील अनेक वृद्धाश्रमांपैकी एक चाळीस-पन्नास वर्षे जुना, शताब्दीच्या वाटेवरील संस्थेने चालवलेला वृद्धाश्रम आहे. त्यातील काही वृद्ध देणगी देणारे, तर काही सरकारी अनुदानाच्या आधारावर जगणारे आहेत. गेली अनेक वर्षे सरकारी अनुदान बऱ्याच उशीराने मिळते; कधीकधी तर तीन वर्षांनंतर.

एकदोन वर्षांपूर्वी वृद्धाश्रमाच्या मातृसंस्थेने वृद्धांना विनंती केली, की अनुदाने उशीराने येत आहेत, तेव्हा वीज-पाणी सांभाळून वापरावे. यावर देणगीदार वृद्धांची प्रतिक्रिया अशी, ''अनुदाने उशिरा येऊनही फुकट्या वृद्धांना संस्था सांभाळू शकते आहे ती आमच्या देणग्यांच्याच बळावर. आता जिथे सरकारला त्या वृद्धांची जबाबदारी वाटत नाही, तिथे आम्ही तरी ती स्वतःला का चिकटवून घ्यावी? तेव्हा आम्ही देणग्या देणेही बंधनकारक मानत नाही!''

काहीतरी ओळखीचे वाटले या कहाणीत, म्हणून *आसु* च्या वाचकांपुढे ती मांडत आहे. फक्त *मी* चा विचार, तोही आर्थिक, हे विवेकी आहे का? वृद्धाश्रम चालू आहे, हेही नोंदतो.

■■

Regd. No. RNP / NP City / 183 / 2012-2014

लेखकपरिचय

गीता महाशब्दे : बारा वर्षांपासून नवनिर्मिती या सामाजिक संस्थेत गणित कार्यक्रमप्रमुख, सर्वशिक्षा अभियानासाठी मुख्य सल्लागार म्हणूनही काम केले आहे.

सुषमा शर्मा : नयी तालीम समितीतर्फे वर्धा येथील सेवाग्राम आश्रमाच्या परिसरात चालविल्या जाणाऱ्या आनंदनिकेतन या शाळेच्या मुख्याध्यापिका.

प्रियदर्शिनी कर्वे : भौतिकशास्त्रातील शिक्षण, समुचित एनव्हायरोटेक प्रा. लि. च्या प्रमुख, शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाच्या विश्वस्त आणि संपादिका.

डॉ.गिरीश सामंत : गोरेगाव येथील शिक्षक मंडळ या संस्थेचे कार्यवाह, *वेध : शिक्षण हक्क कायद्याचा* या पुस्तकाचे लेखक.

डॉ.विवेक मॉंटेरो : गणित व विज्ञानशिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी काम करणाऱ्या नवनिर्मिती या आत्मनिर्भर सामाजिक संस्थेचे संस्थापक व सल्लागार.

वैशाली गेडाम-चालकुरे : चंद्रपूर जिल्ह्यातील जि.प. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये शिक्षका म्हणून कार्यरत.

मधुरा मणेर : टाटा इन्स्टिट्यूटमधून शिक्षणशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण. कमला निंबकर बालभवन, फलटण या शाळेत इंग्रजी व विज्ञान विषयाच्या शिक्षिका.

मंजिरी निंबकर : फलटणच्या प्रगत शिक्षण संस्थेच्या संचालिका व चिटणीस. कमला निंबकर बालभवन च्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका.

* आजीव वर्गणीतील फरक भरण्याची वाढीव मुदत *

*आजचा सुधारक*च्या जुन्या आजीव सदस्यांनी तीन हजार रुपयांमधून त्यांनी पूर्वी दिलेली आजीव सदस्यत्वाची वर्गणी वजा करून वर्गणीतील फरकाची उर्वरित रक्कम **जून 2012** पर्यंत पाठवावी. ती न पाठवल्यास **जुलै 2012** पासून त्यांना अंक पाठवता येणार नाही. याबद्दल दिलगीर आहोत.

वर्गणी मनिऑर्डर, चेक, डीडी यांद्वारे पाठवता येईल. कोअर बँकिंगने भरण्यासाठी **IDBI-54310010015447 (IFSC-IBKL 0000543)** हा खातेक्रमांक वापरावा. मात्र कोअर बँकिंगपूर्वी आपले नाव व पत्ता कळवणारा SMS भरत मोहनी यांना **9822736808** या क्रमांकावर करावा. *आजचा सुधारक*चे वाचक व वर्गणीदार यांचे प्रेम व सहकार्य पुढेही असेच मिळत राहावे. सर्व नव्या-जुन्या वर्गणीदारांनी आपले टेलिफोन नंबर व असल्यास e-mail चे पत्ते लवकर कळवावे ही विनंती.

हे मासिक भरत मोहनी यांनी श्याम ब्रदर्स, रामबाग रोड, गणेशपेठ, नागपूर येथे छापून *गौरीवंदन*, 123, शिवाजीनगर, नागपूर 440010. येथे प्रकाशित केले. दूरभाष : भरत मोहनी : 9822736808

दिवाकर मोहनी : 9881900608, **सर्व पत्रव्यवहार, आजचा सुधारक, *गौरीवंदन*, 123, शिवाजीनगर, नागपूर 440010. या पत्त्यावर करावा.**

ह्या मासिकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.